# जीवन मार्ग

संस्थापक : आर. बी. मोरे

**संपादक**

डॉ. अशोक ढवळे

**कार्यकारी संपादक**

विजय पाटील

**संपादक मंडळ**

अजित अभ्यंकर
डॉ. विठ्ठल मोरे
डॉ. उदय नारकर
सुभाष थोरात
डॉ. रमेशचंद्र पाटकर
राजीव देशपांडे
शोभा ठेकेदत्त
हिरा जनार्दन
प्राची हातिवलेकर

**मुद्रक/प्रकाशक**

डॉ. अशोक ढवळे

**अक्षरजुळणी**

आत्माराम पडवळ

**मुखपृष्ठ व मांडणी**

केतन शिंदे

**व्यवस्थापक**

चंद्रकात शिंदे

**प्रसिध्दी स्थळ**

'जनशक्ती', पी. बी. मार्ग
वरळी, मुंबई -४०० ०१३
फोन : ०२२-२४९५१५७६
फॅक्स : ०२२-२४९६१५२५
ई मेल : mahacpim@gmail.com


# नेमणुकांची भाजपाई पद्धत

संपादकीय

मोदी सरकार शासकीय संस्थांमधील मोक्याच्या जागांवर ज्या विवादास्पद नेमणुका करत आहे, त्यामुळे त्या संबंधित संस्थांना नुकसान पोहोचण्याचा संभव आहे. लेफ्ट. जनरल बिपीन रावत यांची लष्कर प्रमुख म्हणून नेमणूक करण्यात आली. सर्वात वरिष्ठ लेफ्ट. जनरल प्रवीण बक्षी यांची ज्येष्ठता डावलून सरकारने त्यांची निवड केली आहे. ज्येष्ठतेनुसार पुढचा क्रमांक होता, लेफ्ट. जनरल पी. एम. हरीज यांचा. वास्तविक नव्या लष्कर प्रमुखाची निवड निवृत्त होणाऱ्या प्रमुखांच्या निवृत्तीच्या कमीतकमी साठ दिवस आधी घोषित केली जाते. पण यावेळेस जनरल दलबीर सिंग सुहाग हे निवृत्त होण्याच्या केवळ दोन आठवडे आधी ही घोषणा करण्यात आलेली आहे.

इस्टर्न कमांडचे प्रमुख आणि मोठमोठ्या कामगिऱ्या बजावलेल्या लेफ्ट. जनरल बक्षी यांची नेमणूक सेवाज्येष्ठतेनुसार केली जाईल अशीच सर्वांची अटकळ होती. पण त्यांच्या ऐवजी सेवाज्येष्ठतेनुसार तिसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या लेफ्ट. जनरल बिपीन रावत यांची निवड करण्यात आली. त्यामुळे लष्करी वर्तुळात आणि वर्तुळाबाहेरही चुकीचा संदेश जात आहे. लष्करप्रमुखाची निवड हा सरकारचा विशेषाधिकार आहे. पण प्रस्थापित परंपरा डावलत इतरांची सेवाज्येष्ठता बाजूला सारत ज्या पद्धतीने नेमणूक केली आहे, त्यामुळे या नेमणुकीच्या उद्दिष्टाबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

प्रस्थापित प्रक्रियेला बगल देत मोक्याच्या जागेवर आपल्या पसंतीच्या माणसांची नेमणूक करण्याची एक पद्धतच भाजप सरकार आणि मोदी यांनी अवलंबिली आहे. सीबीआयचे संचालक अनिल सिन्हा यांच्या निवृत्तीच्या बरोबर दोन दिवस आधी सर्वात वरिष्ठ अधिकारी आर. के. दत्ता यांची सीबीआयमधून बदली करण्यात आली. त्यानंतर काही दिवसांत गुजरात कॅडरचे आयपीएस अधिकारी राकेश अस्थाना यांना सीबीआयचे प्रभारी संचालक म्हणून नेमण्यात आले.

सीबीआयच्या संचालकाची निवड पंतप्रधान, भारताचे सरन्यायाधीश आणि लोकसभेतील विरोधी पक्षातील सर्वात मोठ्या गटाचा नेता यांच्या समितीकडून होते. ही जागा रिकामी असतानाही त्या समितीची बैठक डिसेंबरमध्ये घेण्यात आली नाही. आता ही बैठक आताचे सरन्यायाधीश जानेवारीत निवृत्त झाल्यावर घेण्यात येईल अशी अटकळ बांधण्यात येत आहे. पंतप्रधानांच्या पसंतीचा संचालक नेमण्यासाठीच हे सर्व चालू आहे असेच या सर्व घडामोडींवरून दिसत आहे. या आधी, मुख्य दक्षता अधिकाऱ्यांची नेमणूकही अशीच संशयाच्या फेऱ्यात सापडली आहे आणि आता ते प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले आहे.

अशा प्रकारच्या नेमणुका शैक्षणिक संस्थांत आणि सांस्कृतिक मंडळांवरही केल्या जात आहेत. हिंदुत्ववादी व्यक्तिंची निवड संशोधन संस्था आणि मध्यवर्ती विद्यापीठांसह शीर्षक शैक्षणिक संस्थांवरही होत आहेत. घटनात्मक आणि कायदेशीर मंडळावरही अशा नेमणुका होऊ लागल्या आहेत. नुकतेच आरएसएसशी संबंधित असलेल्या दोन व्यक्तींची नेमणूक कायदेमंडळावर सभासद म्हणून करण्यात आली आहे.

उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या नेमणुकांवरून सर्वोच्च न्यायालय आणि सरकार यांच्यात सध्या तणातणी चालू आहे. या नेमणुकांत आपलाच शब्द अंतिम मानावा असा मोदी सरकारचा आग्रह आहे. आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या नावाखाली सर्वोच्च न्यायालयाने केलेली नेमणूक नाकारण्याचा अधिकारही मोदी सरकार अंमलात आणू इच्छित आहे.

न्यायालय, नोकरशाही अथवा लष्कर यांसारख्या महत्त्वाच्या आणि मोक्याच्या शासनसंस्थांच्या कार्यक्षमतेवर या सगळ्याचा खोलवर परिणाम होऊ शकतो. भारतीय शासनव्यवस्था हिंदुत्ववादी हुकूमशहांकडून ताब्यात घेण्याचाच हा प्रयत्न आहे. हे प्रयत्न उघड करून हाणून पाडलेच पाहिजेत.

★★★

# ‘मनुस्मृती’चे दहन का? (२)

***२५ डिसेंबर १९२७ रोजी महाडच्या सत्याग्रह परिषदेत ‘मनुस्मृती’चे दहन करण्यात आले. या घटनेवर मनुस्मृतीच्या काही हितसंबंधियांनी टीका केली. त्या काही टीकाकारांपैकी एका टीकाकाराच्या पत्राला डॉ. आंबेडकरांनी ३ फेब्रुवारी १९२८ रोजी प्रकाशित झालेल्या ‘बहिष्कृत भारत’ च्या संपादकीयात सडेतोड उत्तर दिले. ‘जीवनमार्ग’च्या वाचकांसाठी ते पुनर्प्रकाशित करीत आहोत.***

६- कलेक्टरच्या सांगण्यावरून सत्याग्रह थांबविण्यात आला हा महाडच्या परिषदेवर आमच्या मित्राचा दुसरा आरोप आहे. आमच्या टिकाकारांच्या भाषेत सांगावयाचे म्हणजे ‘महाडचा सत्याग्रह म्हणजे कलेक्टरचा खेळ असे झाले.’ आमच्या या टिकाकारांच्या म्हणण्यांत अर्थ असो किंवा नसो, आम्ही कलेक्टरला भिऊन सत्याग्रह थांबविला असे नाशिकच्या स्वातंत्र्यकाराप्रमाणे ते म्हणत नाहीत, हे पाहून आम्हांस एक प्रकारचा आनंद वाटतो. भ्याडपणाने सत्याग्रह केला नाही असा आमच्यावर आरोप करण्याचा जर कोणास अधिकार असेल तर तो एखाद्या सत्याग्रही वीरालाच असू शकेल. ज्याला आजवर सत्याग्रही करण्याचा नव्हे, सत्याग्रह करण्याचा विचार करण्याचा प्रसंग आलेला नाही, ब्राह्मण जातीत जन्मल्यामुळे अष्टाधिकारांचे गाठोडे जन्मत: हाती आले असल्याने ज्याला समाजाच्या विरुद्ध सत्याग्रह करण्याचा प्रसंग येण्याचा कधी संभव नाही, व परार्थसाधनासाठी आपल्या गणगोत्रांविरुद्ध सत्याग्रह करण्याचे ज्यास शील नाही; एकूण सारे आयुष्य स्वत:चे उदर भरण्याकडे खर्ची घालण्याशिवाय दुसरे उज्वल ध्येय नाही. अशा स्वातंत्र्याच्या संपादकाने वीराचा उसना आवेश आणून कलेक्टरला भिऊन सत्याग्रह थांबविला, असे उद्‌गार काढणे हास्यास्पद नव्हे काय? आधी कर आणि मग बोल, असा ज्याचा नियम असेल त्यानेच दुसऱ्याला हिणविण्याच्या भानगडीत पडावे, उत्तराला ठपका देण्याचा अधिकार अर्जुनाचा आहे. तो स्वातंत्र्याच्या संपादकासारख्या बृहन्नडेचा नाही. असो! स्त्रीदाक्षिण्याच्या नियमानुसार अबलेचे कठोर शब्द सोसणे हा देखींल शिष्टाचारच आहे. तथापि पुष्कळशा लोकांचा असा समज झाला आहे की, कलेक्टरचा मनाई हुकूम मोडण्याची आमची छाती झाली नाही, म्हणून सत्याग्रह थांबवण्यात आला. पण या लोकांना आम्ही असे कळवू इच्छितो की, कलेक्टरने मनाई हुकूम काढला होता. ही हकीगतच मुळी चुकीची आहे. कलेक्टर साहेबाने मुळी मनाई हुकूम काढलाच नव्हता. तेव्हा कलेक्टरच्या हुकुमास आम्ही भ्यालो असे जे म्हणतात, त्यांचे म्हणणे सर्वथा अर्थशून्य आहे यांत शंका नाही. कलेक्टर साहेबांनी दंडाची भाषा मुळी केलीच नाही. त्यांचा सारा भर सामदामावरच होता. तेव्हा आमच्यावर जर कोणता आरोप असू शकेल तर आम्ही कलेक्टरचे म्हणणे ऐकले हे बरे केले किंवा वाईट केले एवढयापुरताच असू शकेल.



७ - आम्ही कलेक्टरचे ऐकिले ते योग्य केले असे आमचे प्रामाणिक मत आहे. व तसे मत होण्यास काही कारणेही घडली. त्यापैकी जे कारण खरोखरी निर्णायक ठरले त्याचा आम्ही जसा विचार केला तसा आमच्यावर आरोप करणाऱ्यांनीही केला आहे असे वाटत नाही. सत्याग्रह करण्यास महाड मुक्कामी जे १० हजार अस्पृश्य लोक जमा झाले होते त्यांच्या वाटेत किती कांटे पसरलेले आहेत व ते कोणी पसरलेले आहेत? याची कल्पना या लोकांना तशीच ती आम्हांलाही होती. सत्याग्रहाची मोहिम सुरू झाल्यापासून कुलाबा जिल्ह्यातील व रत्नागिरी जिल्ह्यातील उत्तर भागांतील अस्पृश्य लोकांवर स्पृश्य लोकांचा जो जुलूम चाललेला आहे त्याचे यथार्थ वर्णन करता येणे आम्हांस अशक्य आहे. सत्याग्रहांत कोण भाग घेणार याची नावे नोंदण्यासाठी जशी माणसे बसविण्यात आली होती, तसेच गांवगांवच्या लोकांच्या तक्रारींची नोंद करून घेण्यासाठीही बसविण्यात आली होती. या तक्रारींच्या नोंदपत्रकांचा भारा चाळून पाहीला तो असे दिसून आले की, असा एकही गाव नाही की जेथे गरीब बिचाऱ्या अस्पृश्यांवर, ते केवळ आपली उन्नति करून घेत आहेत एवढयाच कारणांमुळे त्यांच्यावर जुलूम झालेला नाही. सत्याग्रह केल्याने होणारा जोर-जुलूम झालेला नाही. सत्याग्रह केल्याने होणारा जोर-जुलूम द्विगुणित होणारा याबद्दल कोणाच्या मनात शंका नव्हती. परंतु सरकार आमचे संरक्षण करील या भरंवशावर या छळणुकीची आम्ही मुळीच तमा केली नव्हती. सरकारची मदत आहे तोंपर्यंत स्पृश्य लोकांच्या जांचणुकीचे भय बाळगण्याचें आम्हास कारण नव्हतें. परंतु कलेक्टरने उलट खाल्ल्यामुळे अस्पृश्य जनतेस स्पृश्य जनतेच्या जुलूमापासून बचावण्यास अवश्य असणारे सरकारी संरक्षण पूर्णपणे मिळेल किंवा नाही याबद्दल साहजिकपणे शंका उत्पन्न झाली.

८ - ही शंका बलवत्तर होण्यास दुसराही एक विचार कारणीभूत झाला. सत्याग्रह करावयाचा तो दुराग्रहाविरुद्ध करावयाचा. अर्थात कलेक्टरचें म्हणणे धुडकावून सत्याग्रह करण्यापूर्वी कलेक्टरचा दुराग्रह आहे, याची खात्री करून घेणे प्राप्त होते. सरकार झाले म्हणून त्याच्याविरुद्ध सत्याग्रह करताना कसलाच विचार करू नये अशा अर्थाचे जे आमच्या मित्राचे म्हणणे आहे ते आम्हास मुळीच पटत नाही. नव्हे ते कोणाही सत्याग्रही माणसास पटणार नाही. ज्याला ज्याला म्हणून या प्रकरणाची पूर्ण माहिती आहे त्याला त्याला कलेक्टरचा दुराग्रह नव्हता असेच म्हणावे लागेल. कोर्टात प्रकरण जाण्यापूर्वी आपण अस्पृश्य लोकांस तळयावर जाण्यास हरकत करणार नाही, उलट तुम्ही जर त्यांना हरकत कराल तर तुमचा मी बंदोबस्त करीन, असे महाडच्या स्पृश्य लोकांस कलेक्टरने बजाविले होते. शिवाय भरसभेत येऊन आपण तुमच्याविरुद्ध नाही, अशी त्यांनी अस्पृश्य लोकांपुढे कबुली दिली. इतकेच नव्हे तर, हे तळे सोडून इतर कोणत्याही सार्वजनिक तळ्यावर सत्याग्रह करा, आपण मदत करण्यास तयार आहोत, असेही त्यांनी स्पष्ट करून सांगितले. अशा विचारांच्या कलेक्टरांत दुराग्रह आहे, असे कोणी विचारी माणूस म्हणू शकेल असे आम्हांस वाटत नाही. असे असताना त्यांच्या म्हणण्याविरुद्ध सत्याग्रह केला तर स्पृश्य लोकांच्या

जुलूमापासून दाद मागते समयी माझा दुराग्रह नसतां तुम्ही सत्याग्रह केलात मग केले तसे भरा, असे म्हणण्यास कलेक्टरला कारण सापडले असते. दुसरे असे की, सरकारविरुद्ध सत्याग्रह केलात मग केले तसे भरा, असे म्हणण्यास कलेक्टरला कारण सापडले असते. दुसरे असे की, सरकारविरुद्ध सत्याग्रह केल्याने सरकार अस्पृश्यांच्या न्याय हक्कांविरुद्ध आहे, असा एक नसता आरोप सरकारवर लादण्यात आला असता. आम्ही नसताच म्हणतो याचे कारण सरकार अश्पृशांच्या न्याय हक्कांच्याविरुद्ध नाही, अशी कलेक्टरांनी दिलेली कबुली, हे होय. अर्थात सरकारचा अपराध नसताना त्यास विनाकारण बदनाम केल्यामुळे त्यास चिडविल्यासारखे झाले असते. इष्ट असलेली गोष्ट करीत नसतांना ठपका दिला तर माणूस लाजतो. पण ती करीत असताना ठपका दिला तर त्याच माणसाला आपल्याला विनाकारण कलंक लावल्यामुळे त्वेष येतो व बरे करण्याऐवजी तो घात करण्यास प्रवृत्त होतो हा मानसशास्त्राचा अनुभव आहे. अस्पृश्यसमाज हा सरकार आणि स्पृश्य वर्ग या दोन्ही दळांच्या तावडीत सापडलेला वर्ग आहे. त्याला दोहोंपैकी कोणत्या तरी एका दळावर मारा करणे शक्य आहे. दोंन्ही दळांवर एकाच वेळी मारा करण्याइतके बळ त्यांच्यात आज नाही. जेथे स्पृश्य जनता, त्यांचे मानवी हक्क स्वखुशीने व सलोख्याने देत नाही तेथे ते मिळविण्याकरिता सरकारशी तहनामा करणे हेच अस्पृश्य लोकांच्या हिताच्या दृष्टीने शहाणपणाचे आहे, असे आम्हांस वाटले

९- महाडची बारडोली केली असे जे मुर्ख बडबडतात त्यांनी ती का झाली हे समजून घेण्याचे श्रम घेतले असते तर त्यांनी छिद्रानवेश करण्याऐवजी शरमेने आपल्या माना खाली घातल्या असत्या. स्पृश्यांच्या सत्याग्रहांत व अस्पृश्यांच्या सत्याग्रहांत जमीन असमानचे अंतर आहे. स्पृश्य लोकांचा सत्याग्रह सरकारविरुद्ध असतो व त्याला सर्व जनतेचा पाठिंबा असतो. असे असताना स्वराज्याचा अट्टाहास करणाऱ्या स्पृश्य लोकांनी कोणता एखादा सत्याग्रह करण्याची तयारी केल्याचे ऐकिवात नाही. अस्पृश्य लोकांनी सत्याग्रह केला तर त्याला साऱ्या स्पृश्य जनतेचा विरोध असतो. समाजाशी सामना करणे साधे काम नाही. असे असता ही अस्पृश्य जनतेच्या विरुद्ध सत्याग्रह करण्याची अस्पृश्य वर्गाने आपली तयारी दाखविली होती. येवढया मुळेच अस्पृश्य लोक कोणाही समंजस माणसाच्या आदरास पात्र झाले पाहीजेत. तयारी करून चाल करण्याचे त्यांनी थांबिवले तर ते स्पृश्य वर्गाने युद्धाच्या अधर्म पद्धतीचा अवलंब केल्यामुळेच होय. स्पृश्य लोकांनी तुम्ही धर्म युद्ध करावे आणि मग त्यांनी आमची परीक्षा पाहावी. यावर काही छिद्रान्वेशी लोक असे म्हणण्याचा संभव आहे की, स्पृश्य जनतेकडून जुलूम होणार याची कल्पना सत्याग्रहास जमलेल्या लोकांना पूर्णपणे होती. तो जोर जुलूम सोसण्यास ते जर आपण होऊन तयार झाले होते जर त्यांची काळजी घेण्याचे सोंग तुम्ही का केले? असल्या आक्षेपकांस आमचा असा प्रश्न आहे की, अनूयायांच्या हिताची काळजी पुढाऱ्यांनी घेऊ नये तर कोणी घ्यावी? स्वामीनिष्ठेने पुष्कळसे लोक आगीत उडी टाकण्यास आपल्या जिवावर उदार होतात. परंतु सेवक आपल्या जिवावर उदार झाला तो स्वखुशीने झाला आहे तेव्हा आपल्याला काय? त्याचे तो भोगील, असे मानून आपली जबाबदारी जर त्याचा स्वामी टाळू म्हणेल तर त्याला लोक अधम म्हणतील. आपल्या जिवावर उदार होणारा सेवक आपला स्वामी अखेरीस आपला बचाव करील अशी आशा धरून असतो हे कोणीही नाकबूल करणार नाही. नाही म्हणता तशी आशा सत्याग्रहास जमलेल्या मंडळीस होती व ती असणे साहजिक आहे. तेव्हा त्यांच्यावरील संकटाचे निवारण करण्याची जबाबदारी जी पुढाऱ्यावर पडावयाची ती काही चुकत नाही हे आम्हांस ओळखणे प्राप्त होते. अशा परिस्थितीत सत्याग्रह करणाऱ्या लोकांना त्यांच्यावर येणाऱ्या संकटात आम्हांला कसे सहाय्य करता येईल त्याचा विचार करणे भाग पडले. अत्याचाराचा अवलंब करून, संरक्षण करता येण्यासारखे आहे. पण तो मार्ग पत्करावयाची इच्छा आम्हांस नाही. आज तरी आमच्या लोकांचे संरक्षण सनदशीर मार्गानेच आम्हांस साधावयाचे आहे. व त्या करितांच कलेक्टरची मर्जी राखण्याच्या भरीस आम्ही पडलो.

१०- कलेक्टरची मर्जी राखली पण लोकांची निराशा करून, त्यांच्या तेजोभंगास कारणीभूत झालांत असाही काही जणांचा आरोप आहे. अशा रीतीने जो जोम आज लोकांत उत्पन्न झाला होता तो पुढे टिकेल काय अशी पुष्कळांना शंका येते. हे त्यांचे म्हणणे काही अंशी खरे असू शकेल. पण ते सर्वस्वी खरे असू शकणार नाही. सूर्यास्त झाल्यावर संधिकाल येतो तसेच सत्याग्रह थांबल्यामुळे लोकांचा हुरुप ओसरेल हे खरेंच. तथापि सूर्यास्तापाठी संधिकाल झाला म्हणून पुन्हां केव्हांच सूर्योदय होणार नाही, हें म्हणणें जसें चुकीचे आहे तसेंच आजचा जोम ओसरला म्हणून, त्याचा संचार पुन्हा कधीच व्हावयाचा नाही हे म्हणणेही चुकीचे आहे. शिवाय उत्साह निरुत्साह यांच्या बाबतीत एक गोष्ट ध्यानांत घ्यावयास पाहीजे होती ती ही की, ज्याच्या वर प्रसंग नाही तो मनुष्य मृतप्राय असतो. कठीण योग आल्याशिवाय माणसाच्या अंगांत चैतन्य उत्पन्न होत नाही. तथापि योगांचे काठीण्य, त्याची दुर्धरता पल्ल्याचे बाहेर गेली म्हणजे देखील माणूस पुन: मृतप्राय होतो व ती गोष्ट आपणास असाध्य आहे म्हणून तिचा नाद सोडून निराश होऊन प्रयत्न करण्याचे सोडून देऊन बसतो. सत्याग्रहाची ही जी चळवळ आरंभिलेली होती ती केवळ चवदार तळे काबीज करण्यापूरती आरंभिलेली नव्हती. तर अस्पृश्य लोकांना आपल्यापुढे ठेविलेले ध्येय पदरांत पडतोपर्यंत ती कायम टिकावी या हेतूने ती उभारण्यात आली होती. ती कायम टिकेल किंवा नाही हे सत्याग्रहापासून होणारा जुलूम किती मोठा होईल व त्यापासून लोकांचा बचाव करण्याची साधने आहेत किंवा नाहीत यावरच अवलंबून राहणार. महाडचा एक सत्याग्रह लोकांनी केला असता; पण त्यापासून होणाऱ्या त्रासांतून आपला बचाव होऊं शकत नाही, हे जर लोकांना कळले असते तर त्यापुढे होणाऱ्या दुसऱ्या कोणत्याही सत्याग्रहांत भाग घेण्यास ते तयार झाले असते किंवा नाही यांचा विचार करणे अवश्य आहे. विचारांती ती शंका खरी होण्याचा पुष्कळसा संभव वाटल्यामुळे, अनेक सत्याग्रह करण्याइतका जोम कायम टिकावा म्हणून महाडचा सत्याग्रह तहकूब करणे भाग झाले. आता काही लोक असे म्हणतील की, हे सर्व भविष्य जर तुम्हांस दिसत होते तर तुम्ही महाडला गेलातच कशाला? याला आमचे उत्तर असे आहे की, कलेक्टर आमची बाजू सोडील असा संशय आम्हांस दासगावंला पोहोचेपर्यंत आला नव्हता. दासगावला जाईतोपर्यंत फक्त दिवाणी कोर्टाचा तात्पुरता मनाई हुकूम सुटल्याचे आम्हास माहीत होते. परंतु तो मनाई हुकूम सुटल्याचे आम्हास माहीत होते. परंतु तो मनाई हुकूम मोडण्याचा आम्ही निश्चय केलेला होता. दिवाणी कोर्टाचा मनाई हुकूम मोडल्याने आम्हांस कोर्टाला सहा सहा महिने शिक्षा करण्याचा अधिकार आहे हे आम्ही जाणून होतो. तथापि ती शिक्षा भोगण्याची आमची तयारी होती. व तसे आम्ही आमच्याकडे चौकशीस आलेल्या अधिकाऱ्यांस अगदी स्पष्टपणे कळविले होते. दिवाणी कोर्टाचा हुकूम मोडल्यामुळे, जे मोडतील ते तुरुंगात जातील, आपल्याला ह्या भानगडीत पडण्याचे कारण नाही असे म्हणून कलेक्टर त्रयस्थाप्रमाणे स्तब्ध बसेल अशी आमची समजूत होती. व ती समजूत चुकीची आहे असे मानण्यांत कसल्याच प्रकारचे कारण घडले नाही. परंतु अस्पृशांची बाजू घेणारा कलेक्टर कोर्टाची इभ्रत राखणाच्या दृष्टीने स्पृश्यांच्या बाजूचा झाला. व स्पृश्य लोकांच्या जुलूमापासून बचाव करण्यास त्याचे साहाय्य अवश्य असल्यामुळे, त्याचा सल्ला ऐकावा लागला. यावरून आमच्या मित्राला कळलेच की, सत्याग्रह थांबला तो तुरुंगात जाण्याच्या भीतीमुळे किंवा कलेक्टरच्या भिडेमुळे थांबला नसून, अपृश्य वर्गाचे हिताकरितांच

थांबविण्यात आला. त्यांत स्पृश्य लोकांतील टवाळ कंपूस हसण्यास जागा झाली असेल. पण स्पृश्य लोकांकडून शाबासकी मिळविण्यासाठी हे कार्य मुळी आरंभिलेलेच नव्हते. ते केवळ अपृश्यांच्या हित सवंधर्नासाठीच आरंभिलेले होते. तुरुंगात जाण्याने ते साधले असते तर ते करावयास कोणाचीच ना नव्हती.

११ – आमच्या मित्रांना आमच्या चळवळीस सत्य शोधकी वळण लागेल याचे भय वाटत आहे. सत्यशोधकी चळवळ म्हणजे ब्राम्हणाचा द्वेष करणारी, राजकारणांत भाग न घेणारी, सरकारच्या नजरेकडे लक्ष ठेवून काम करणारी अशी आजपर्यंतची महाराष्ट्रांतील रुढ कल्पना आहे. व या कल्पनेत समाविश असलेले वळण अस्पृश्यांच्या चळवळीस न लागेल अशी खबरदारी घेण्याविषयी त्यांनी आम्हांस इशारा दिला आहे. आमच्या मित्रास आम्ही असे सुचवितो की, आम्हीही सत्यशोधकीच आहोत. व त्याबद्दल आम्हांस कोणत्याही तऱ्हेचा विशाद न वाटता उलट आनंदच वाटतो. सत्यशोधकी चळवळ म्हणजे, समानतेची व सद्धर्माची चळवळ असे आमचे ठाम मत आहे. इतकेच नव्हे तर दरेक स्वराज्यवाद्याने सत्यशोधकी असलेच पाहीजे असे आमचे ठाम मत आहे. आमच्या मित्रांनी चालू सत्यशोधकी चळवळीवर जो आरोप केला आहे तो मात्र काही अंशी खरा आहे असे कबूल करणे क्रमप्राप्त आहे. परंतू हे वळण या चळवळीस का लागले? याचा विचार आमच्या मित्रांनी जितका करावयास पाहीजे होता तितका केला नाही असे आम्हास म्हणावे लागते. सत्यशोधकी चळवळीला अशा प्रकारचे अनिष्ट वळण लागल्याचे मुख्य कारण म्हटले म्हणजे ब्राम्हण जातीचा त्या चळवळीस होणारा एकजात विरोध हेच होय. ब्राम्हण जातीतील काही लोकांनी तरी सत्यशोधकी चळवळीने आपल्यापुढे मांडलेली समानतेची व सद्धर्माची तत्वे मान्य केली असती तर सत्यशोधकी चळवळीस ब्राम्हण द्वेषाचे भूत लागले नसते किंवा तिच्या प्रसारार्थ तिला सरकारची कांसही धरावी लागली नसती. अशी परिस्थिती असल्याकारणाने आमच्या मित्रांस आमची अशी सूचना आहे की, त्यांनी सत्यशोधक व्हावे आणि आपल्या जातभाईसही सत्यशोधक बनविण्याचा प्रयत्न करावा.

१२ – अस्पृश्य वर्गाने अवश्य असलेले हक्क मिळविण्यासाठी जसा प्रयत्न करणे आवश्यक आहे तसाच मिळवलेले हक्क उपयोगात आणण्याचेही प्रयत्न करणे जरूर आहे. पेशवाईकाळी जो राज्यकारभार चालत असे तो एकतंत्री चालत असे. प्रजेची सुखदु:खे कोणती याची विचारपूस कोणीच करीत नसे व त्यामुळे दाद मिळणेही कठीण होत असे. त्यांतल्यात्यांत अस्पृश्य वर्गाची स्थिती तर अत्यंत केविलवाणी अशी असे. पेशवाईतील राज्य-कारभारांतील एकतंत्रीपणा जाऊन, ब्रिटीश आमदानीत प्रजासत्ताक राज्यपद्धतीला सुरवात झाली आहे. व त्या प्रमाणे म्युनिसिपालिट्या, लोकल बोर्ड वगैरे स्थानिक संस्थांना पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले आहे व त्यांच्याकडे शिक्षणासारख्या महत्वाच्या बाबीही सोपवून दिल्या आहेत. या संस्थाचा उपयोग अस्पृश्य वर्गाच्या हितसंवर्धानाकडे होईल किंवा नाही हे अस्पृश्य वर्गानी निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या लायकीवर व कार्यक्षमतेवर पुष्कळ अंशी अवलंबून राहणार आहे. यास्तव वरील संस्थात आपले प्रतिनिधी निवडून देतांना अस्पृश्य वर्गाच्या मतदारांनी अत्यंत काळजी घेणे अवश्य आहे. पुणे म्युनिसिपालिटीची निवडणूक अगदी जवळ आली आहे व तिच्यांत पुण्यातील अस्पृश्य वर्गातर्फे दोन प्रतिनिधी निवडून जावयाचे आहेत. या दोन जागांकरिता अनेक उमेदवार आहेत असे आम्ही ऐकतो. त्यापैकी सुभेदार घाडगे व रा. पांडुरंग नथूजी राजभोज हे दोघे आहेत. वरील दोन्हीही गृहस्थ म्युनिसिपालिटीत काम करण्यास सर्वतोपरी लायक आहेत याबद्दल आम्हांस मुळीच संशय नाही. आम्ही अनुभवाने सांगतो की, या दोघांमधील चिकाटी, धाडस व कळकळ वाखाणण्यासारखी आहे. पुण्यांतील अस्पृश्य लोकांनी त्यांनाच निवडून द्यावे अशी आमची आग्रहाची सूचना आहे. सगळया जागा महार लोकच आडवताच व मांग लोकांच्या वाट्यास काहीच येऊ देत नाहीत असा शंख ध्वनि करणारे रा. सकट निवडणुकीला उभे राहीले नाहीत याचे आश्चर्य वाटते. माटेकंपूच्या साहाय्याने म्युनिसिपालिटीच्या स्कूल बोर्डात आपली नेमणूक करून घेण्याचा त्यांचा कावा असावा असा आमचा तर्क आहे. हे जर खरे असेल तर तसे न होण्याची खबरदारी पुणेकरांनी आतापासूनच घ्यावी हे बरे. लायकी नालायकी न पहातां केवळ मातंग समाजाची कोठे तरी वर्णी लावावयाची असेच जर असेल तर रा. सकटापेक्षा रा. लोखंडे यांना तो मान मिळणे उचित आहे असे आम्हांस वाटते.

★★★

## (जमसं अधिवेशन... पान १२ वरून)

(जमसं अधिवेशन... पान १२ वरून)

### अधिवेशनाची क्षणचित्रे

प्रत्येक दिवशी सत्र संपल्यावर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कवयित्री संमेलन, मध्य प्रदेश ज्ञान-विज्ञान जत्था व केरळच्या कन्नूर जिल्हा कमिटीने बसवलेली नाटके, सुषमा देशपांडे लिखित व दिग्दर्शित 'मैं सावित्रीबाई फुले' हा नितांत सुंदर एकपात्री प्रयोग व उद्‌घाटन सत्रात सुप्रसिद्ध गायिका नागीन तन्वीर यांचा लोकगीत व क्रांतिकारक गीतांचा कार्यक्रम, हे सर्व कार्यक्रम म्हणजे श्रवणेंद्रियांना अक्षरशः मेजवाना होती.

पाचही दिवस अत्यंत भरगच्च कार्यक्रमांची आखणी करण्यात आली होती. मात्र शेवटच्या सत्रापर्यंत महिलांचा केवळ सहभागच नव्हे तर उत्साहही कायम होता.

भाजपच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने पराकोटीचे असहकार्य दाखवून देखील मध्य प्रदेश जमसं ने इतर भ्रातृभावी संघटनांच्या मदतीने एवढ्या मोठ्या कार्यक्रमाचे चोख नियोजन केले. जवळपास प्रत्येक वक्त्याने आपल्या भाषणात या सर्व कार्यकर्त्यांना व त्यांच्या मेहनतीला मनापासून दाद दिली.

अधिवेशनाच्या निमित्ताने पारंपारिक कपडे, दागिने इ. विक्रीचे विविध स्टॉल्स लावण्यात आले होते. मात्र सर्वात जास्त गर्दी होती ती पुस्तक विक्रीच्या स्टॉल्सवर, ही सूचक बाब होती.! ★★★

## सिटू राज्य कौन्सिलची बैठक

### दि.१५ जानेवारी २०१७, औरंगाबाद

सिटूच्या महाराष्ट्र राज्य कौन्सिलची बैठक रविवार दिनांक १५ जानेवारी २०१७ रोजी सकाळी १० वाजता शहीद भगतसिंग हायस्कुल, बजाज नगर, वाळूंज एमआयडीसी, औरंगाबाद येथे सिटूचे राज्य अध्यक्ष डॉ. डी. एल.कराड यांचे अध्यक्षतेखाली व सिटूचे राष्ट्रीय महासचिव खासदार तपन सेन यांच्या उपस्थितीत होणार आहे.

तरी सर्व सदस्यांनी या बैठकीस वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**ॲड. एम. एच. शेख**
**राज्य सरचिटणीस**

**संपर्क** - ॲड. उध्दव भवलकर, मोबाईल - ९४२२२०२०६४

# गव्हाची आयात शुल्क माफी शेतकऱ्यांच्या मुळावर

डॉ. अजित नवले

गव्हाच्या आयात शुल्कात कपात करून ते शून्यावर आणण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयामुळे देशभरातील गहू उत्पादक शेतकऱ्यांमध्ये कमालीची अस्वस्थता पसरली आहे. या निर्णयापायी देशांतर्गत गव्हाच्या किमती कमी होत असून चार महिन्यानंतर नवा गहू बाजारात आल्यावर तर त्या आणखी कोसळतील हे उघड आहे.

देशात गव्हाचा अतिरिक्त साठा पडून असतानाही काही खाजगी कंपन्या गव्हाची मोठया प्रमाणात आयात करीत होत्या. त्याचा गव्हाच्या किमतींवर परिणाम होऊन शेतकरी तसाही संकटात सापडतच होता. बिस्किटे, पास्ता, टोस्ट यांसारखी उत्पादने तयार करणाऱ्या कंपन्यांकडून होणारी ही आयात नियंत्रित करण्यासाठी अशा आयातीवर केंद्र सरकारने २५ टक्के आयात शुल्क लागू केले होते. गव्हाचे भाव वाढत असल्याचे कारण देत या शुल्कात कपात करून सप्टेंबरमध्ये ते १० टक्क्यांवर आणण्यात आले आणि आता तर ते थेट शून्यावर आणण्यात आले आहे.

जागतिक स्तरावर गहू उत्पादनात भारताचा दुसरा क्रमांक लागतो. गत वर्षी देशात ८.५६ कोटी टन गव्हाचे उत्पादन घेण्यात आले. पंजाब, हरयाणा, मध्यप्रदेश, राजस्थान, बिहार, गुजरात, महाराष्ट्रासह अनेक राज्यातील शेतकऱ्यांचे गहू हे महत्वाचे पीक आहे. महाराष्ट्रात गोदावरी, कृष्णा व तापीच्या खोऱ्यात २० लाख हेक्टर्स क्षेत्रावर शेतकरी गव्हाचे उत्पादन घेत असतो. त्याचे गव्हाचे पीक उभे असतानाच सरकारने हा निर्णय जाहीर केला आहे. तो अगोदर जाहीर झाला असता तर कदाचित इतर पिकांकडे वळण्याचा विचार शेतकऱ्यांना करता आला असता.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी व शेती किफायतशीर करण्यासाठी मोदी सरकारने गेल्या वर्षीच शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणार असल्याची घोषणा केली होती. पण आयात शुल्क रद्द करून देशांतर्गत गव्हाचे भाव पाडून सरकार शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट कसे काय करू शकेल? असा थेट प्रश्न शेतकऱ्यांच्या मनात उभा राहिला आहे. सरकारने २०१६ साठी गव्हाला १५२५ रुपयांचा आधारभाव जाहीर केला आहे. तो निश्चित करण्यासाठी सरकारने गव्हाचा प्रति क्विंटल उत्पादन खर्च केवळ ११६३ रुपये धरला आहे. राज्यातील कृषी विद्यापीठाच्या माहितीनुसार तो किमान २५१६.२४ रुपये धरणे अपेक्षित आहे. उत्पादन खर्च २५१६ असताना तो ११६३ रुपये धरून १५२५ रुपयांचा आधारभाव ठरविणे मुळातच अत्यंत अन्यायकारक व हास्यास्पद आहे.

या निर्णयामागे ग्राहक हित असल्याचा केंद्रीय खाद्यान्न मंत्री रामविलास पासवान यांचा दावाही तपासून पाहण्याची आवश्यकता आहे. देशात सध्या सरासरी २० रुपये किलो दराने गहू विकला जातो. हाच गहू दळून पॅकबंद केलेल्या किलोभर आट्याची पाकिटे मात्र ग्राहकांना ५० ते ७०रुपये किलो दराने विकत घ्यावी लागतात. जाहिराती व सुंदर आवरणात पॅकबंद केलेले टोस्ट २०० रुपये किलो दराने विकले जातात. पिझ्झा, बिस्किटे, बेकरी उत्पादने अव्वाच्या सव्वा किमतीला विकली जातात. कंपन्या त्यातून अमाप नफाही कमावतात. मात्र गहू स्वस्त मिळाल्यानंतर या कंपन्या आपल्या उत्पादनांचे भाव कमी करून त्याचा लाभ ग्राहकांना मिळवून देण्याचा कधीही विचार करीत नाहीत.

साहजिकच सरकारच्या निर्णयाचा अमर्याद लाभ ग्राहकांऐवजी उत्पादक कंपन्यांनाच होणार आहे. शेतकऱ्यांच्या ताटातील काढून या कंपन्यांच्या ताटात वाढण्याचाच हा प्रकार आहे. अन्नधान्याचे बाजारभाव ग्राहक आणि उत्पादक या दोहोंना न्याय देणारे असावेत यासाठी बाजारात हस्तक्षेप करण्याची जबाबदारी सरकारची असते. विविध कायदे, योजना व यंत्रणांद्वारे सरकारला यासाठी अमर्याद अधिकार प्राप्त झालेले असतात. सरकार यासाठी भारतीय खाद्य निगमच्या माध्यमातून अन्नधान्याची खरेदी करून ठेवत असते. भाव वाढू लागताच सरकारच्या गोदामात साठविलेले हे साठे बाजारात आणून भाव नियंत्रण करणे अपेक्षित असते. अनुदानांनी स्वस्त झालेला विदेशी शेतीमाल भारतीय बाजारात आणून भारतीय शेतीमालाचे भाव पाडण्यापेक्षा हा उपाय चांगला असतो. सरकार यावेळी हा उपाय अंमलात का आणू शकले नाही, याचे कारण गंभीर आहे.

सरकारने गेली पाच वर्षे गव्हाची खरेदी कमी कमी करत नेली आहे. परिणामत: सरकारच्या गोदामांमध्ये गव्हाचा साठा गेल्या पाच वर्षाच्या तुलनेत आज न्यूनतम स्तरावर पोहचला आहे. सन २०१२ च्या तुलनेत भारतीय खाद्य निगमच्या गोदामातील गव्हाचा साठा ३७६.५२ लाख टनांवरून कमी कमी होत तो आज २०१६ मध्ये १६४.९२ लाख टनांवरून खाली घसरला आहे. भारतीय शेतकऱ्यांकडून गहू खरेदी न करण्याच्या सरकारी उदासीनतेची किंमत देशवासीयांना चुकवावी लागत आहे.

राज्यात सिंचनाच्या प्रश्नांवरून सातत्याने रणकंदन होत असते. विशेषत: दुष्काळ असला की, पाण्याच्या समन्यायी वाटपाच्या, जल पुनर्भरणाच्या, सूक्ष्म सिंचनाच्या गंभीर चर्चा होत असतात. राज्यात एकूण लागवडयोग्य जमिनीपैकी केवळ चार टक्के जमिनीवर घेतल्या जाणाऱ्या ऊस पिकास राज्यातील एकूण संचित सिंचन जलसाठ्यापैकी तब्बल ७० टक्के पाणी वापरले जाते. दुष्काळग्रस्त महाराष्ट्राला ऊसावरील पाण्याची ही चैन न परवडणारी आहे. शेतकऱ्यांनी म्हणूनच ऊसाऐवजी इतर पिकांकडे वळावे, असा सल्ला दिला आहे. शेतकऱ्यांनी खरोखरी तसे करावे असे वाटत असेल तर त्यांना अशा पर्यायी पिकांमधून उत्पन्नाची हमी देण्याची आवश्यकता आहे. सरकार मात्र पर्यायी पिकांचे भाव पाडण्यातच धन्यता मानत आहे.

गव्हाची रोडावलेली आवक व बाजारातील वाढते भाव यापेक्षाही पंजाब व उत्तर प्रदेश या राज्यात होऊ घातलेल्या निवडणुका हेच आयात शुल्कमाफीमागचे मुख्य कारण असल्याचे जाणकार सांगतात. ऐन निवडणुकीच्या तोंडावर गव्हाचे भाव वाढले तर मतदार राजा नाराज होईल या भीतीपोटी सरकारने हा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे निवडणुका होऊ घातलेली ही राज्येच देशातील मुख्य गहू उत्पादक राज्ये आहेत. ग्राहकांना खुश करताना या राज्यात मोठ्या संख्येत असणारा गहू उत्पादक शेतकरी नाराज होणार आहे. राज्यकर्त्यांना मात्र त्याच्या नाराजीची तमा नाही.

शेतकरी संघटीत नाहीत. त्यांच्या वरील अन्यायाविरोधात मतपेटीतून राजकीय प्रतिक्रिया उमटविण्याचे कसब त्यांनी आत्मसात केलेले नाही. त्यांच्या असंतोषाला आवाज नाही. त्यामुळेच शेतकऱ्यांना बेमालूमपणे गृहीत धरता येते. असंतोष पसरलाच तर जात आणि धर्माचे जालीम औषध वापरून हा असंतोष नाहीसा करता येतो. ग्राहकांना मात्र असे गृहीत धरून चालत नाही. त्यांना आवाज असतो. ते राजकीय प्रतिक्रिया देऊ शकतात. राज्यकर्ते त्यामुळे नेहमीच दिखाऊ पातळीवर ग्राहकांना गोंजारत असतात. ठोस पातळीवर कार्पोरेट देणगीदारांना लाभ पोहचवीत असतात. संघटीत नसणाऱ्या शेतकऱ्यांची अवहेलना नि उपेक्षा करीत असतात. भारतीय लोकशाहीची हीच खरी वेदना आहे. गव्हाच्या आयात शुल्कमाफी मागचे हेच खरे वास्तव आहे.

★★★

# सुलभा ब्रह्मे : कृतिशील समाजवैज्ञानिक

**दत्ता देसाई**

सहा वर्षांपूर्वीची घटना. आम्ही पुण्यातून कोल्हापूरला बिऱ्हाड हलवायचे ठरवले होते. काही मित्र-मैत्रिणींना घरी बोलावणे-भेटायला जाणे असे कार्यक्रम सुरू होते. विनया म्हणाली, ''आपण सुलभाताईंना जेवायला बोलवूया, कोल्हापूरला जाण्यापूर्वी.'' मी जरा बावचळलोच. म्हणाले,''अग, त्यांची तब्येत-पथ्यं आणि कामाचा धबडगा यात त्या कशा येतील?'' तरीही विनयाचा आग्रह सुरूच राहिला. मी म्हणालो,''मला बोलायला जरा भीड वाटते, तूच बोल ना!'' 'ठिकाय' असे म्हणून विनया त्यांच्याशी बोलली. त्यांच्याशी बोलून तिने जेवणाचा बेत ठरवला. त्या आल्या. प्रत्येक पदार्थ चवीने खाल्ला. पाककृती विचारली. 'मी आज खूप जेवले' म्हणाल्या. भरपेट दोन-तीन तास गप्पा झाल्या. कॉफी विचारल्यावर 'मी सहसा घेत नाही, पण कर' म्हणाल्या. कॉफी आणि सुपारीचा आस्वाद घेऊन मग निवांतपणे परतल्या.



आम्ही खूप खूश तर होतोच पण दोन दिवस मी स्वत: त्या 'शॉक' मधून बाहेर आलो नाही. आजही तो प्रसंग आठवला की त्यांच्या भेटीचे समाधान पुन्हा समोर येते.

सुलभाताईंबद्दलची आपली जी प्रतिमा आहे, त्यापेक्षा त्या किती वेगळ्या आहेत हे स्पष्ट जाणवले. एवढेच नव्हे तर विशिष्ट कारणे, कामे आणि स्वभाव यामुळे एखाद्या व्यक्तीची आपल्या मनात - आणि बऱ्याचदा भोवतालच्या वर्तुळात - विशिष्ट प्रतिमा कशी बनते आणि आपण कळत-नकळत त्या व्यक्तीला त्याच प्रतिमेत ढकलून ढकलून बंदिस्त करत जातो की काय असाही प्रश्न मला पडला.

मी सुलभा ब्रह्मे यांना प्रथम ओळखू लागलो ते १९७८ च्या अखेरीपासून - मुंबईत 'तात्पर्य' मासिक हाती पडले तेव्हापासून त्याच्या प्रत्येक अंकावर 'संपादक-मंडळ' या यादीत त्यांचे नाव असे आणि ते आडनाव (ब्रह्मे) मी प्रथमच पाहत असल्याने ध्यानात राहिले. १९८० च्या पूर्वार्धात बँकेतून बदली होऊन पुण्याला आलो. 'तात्पर्य'च्या संपादकांना - सुधीर बेडेकरांना - भेटायला डेक्कन जिमखान्यावरच्या त्यांच्या बंगल्यातील कार्यालयात गेलो आणि जातच राहिलो. 'तात्पर्य', लोकविज्ञान संघटना आणि शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालय या तिन्हींचा अड्डा तिथे होता. तिन्हीशी आणि तसेच डॉ. सुलभा ब्रह्मे यांच्याशी प्रत्यक्ष परिचय झाला. त्या या तिन्हींशी संबंधित तर होत्याच, पण हळूहळू पुण्यातील डाव्या-पुरोगामी विविध उपक्रम, संस्था आणि चळवळी यांच्याशी जसा माझा परिचय होत गेला तसतसे तिथे तिथे सुलभाताईंचे क्रियाशील अस्तित्व दिसत गेले.

म्हटले तर सुलभाताईंचे व्यक्तिमत्त्व हे डेक्कन जिमखाना - प्रभात रस्ता - एरंडवणे परिसरातील उच्च-मध्यमवर्गीय स्वरूपाचे दिसे. नेमके आणि स्पष्ट बोलणे, माफक हसणे आणि कामातले गांभीर्य, काम सोडून इतर सटरफटर गोष्टींमध्ये वेळ न दवडणे आणि एकंदर शिस्त यामुळे माझ्यावर सुरुवातीला दडपण असे. मात्र त्या अड्ड्यावरची बरीच मंडळी - अगदी त्यांच्यापेक्षा खूपच कमी वयाची तरुण मंडळीही - त्यांच्याशी दडपण न घेता बोलत, वाद घालत आणि मोकळेपणाने मतभेदही व्यक्त करत. हे मला नवीन होते.

१९७९-८० पासून मला मार्क्सविचाराबद्दल औत्सुक्य निर्माण झाले होते आणि इथे बेडेकर, डॉ. अनंत फडके यांच्याबरोबरच मार्क्सवादी अर्थतज्ज्ञ सुलभाताई भेटणे हे म्हणजे मला घबाड सापडल्यासारखे वाटले. अर्थात माझ्या भीडस्तपणामुळे सुरुवातीला बराच काळ त्यांच्याशी खूप संवाद नव्हता, पण नंतर तो वाढला.

गेल्या ३५ वर्षांत त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणि स्वभावाचे अनेक पैलू मला जाणवत गेले आणि त्यात झालेले काही बदलही मी अनुभवले. त्या स्पष्ट, परखड होत्या. काही वेळा फटकळ वाटत आणि त्यांच्या आग्रहीपणाचे रूपांतर कधीकधी दडपण येण्याइतके टोकदार बनत असे. मात्र त्यांच्यात एक तर 'आत एक आणि बाहेर एक' असे नव्हते. फुटकळ, डावपेची गोष्टींना त्यांच्याकडे थारा नसे. त्यांचे काम, मत, युक्तिवाद आणि राजकारण हे थेट असे आणि त्या चर्चेला नेहमीच तयार असत. एखाद्या गोष्टीवर एखाद्या सहकाऱ्याशी अगदी कडाक्याचा वाद झाला तरी 'पुढच्या भेटीत त्या पुन्हा खुल्या मनाने आणि 'जणू आधी काही घडलेच नाही' असे अगदी सरळपणे बोलत. मला हेही नवे होते. दबकणाऱ्या, भिडस्त, सौम्य, शांत प्रवृत्तीच्या माणसांना अनेकदा याचे दडपण येई. मात्र थोड्या दिवसात हेही लक्षात येई की, यामागे त्यांची स्वत:ची कामाविषयीची तळमळ आणि प्रत्येक व्यक्तीकडून असलेली शिस्त व किमान बांधिलकीची अपेक्षा यामुळेही असे होते. यामागे सार्वजनिक कार्य पुढे जावे हा उद्देश असे. गंमत म्हणजे, त्यांच्याशी मोकळेपणाने आणि समान पातळीवरून वागणाऱ्यांना त्यांच्या या स्वभावाचे दडपण येत नसे. मी पूर्ण वेळ कामात पडल्यावर अगदी थोडा काळ पहिल्या प्रकारचा थोडा अनुभव घेतला आणि नंतर गेली ३० हून अधिक वर्षे दुसऱ्या, समान पातळीवरून वागण्याचाही अनुभव घेतला. त्यांचा पिंड हा लहान-मोठ्या सर्वांना समानपणे वागवण्याचा होता. सर्वांशीच त्या आदरानेही वागत - आणि अर्थातच मोठ्या, ज्येष्ठ व्यक्तींबाबतचे मतभेदही त्या परखडपणे नोंदवत, किंवा संवाद होत नाही असे वाटल्यास तो त्या टाळत.

पण प्रथमपासून अखेरपर्यंत त्यांचा सर्वांशी संवाद चालू राहिला. आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय पातळीवरचे तज्ज्ञ व अभ्यासक, परिवर्तनवादी प्रवाहातील राजकीय नेते, विविध जनआंदोलनांमधील आणि समाजवादी-साम्यवादी-पर्यावरणवादी प्रवाहातील ज्येष्ठ व तरुण कार्यकर्ते अशा सर्वांशी त्यांचा संवाद करण्याचा प्रयत्न असे. कार्यकर्ते आणि विविध प्रयोगशील व्यक्ती, कष्टकरी-दलित-आदिवासी विभाग आणि युवक-युवती अशा सर्वांविषयीची त्यांची आस्था, प्रेम आणि तळमळ ही वादातील होती.

कार्यकर्त्यांना आणि परिवर्तनवादी गट-संघटना-उपक्रम यांना त्यांनी आयुष्यभर केलेली मदत हा एक मोठाच विषय ठरेल. १९८३ मध्ये बँकेतील नोकरी सोडून लातूरहून मी पुण्याला समाजविज्ञान अकादमीचा पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून येण्याचा निर्णय जेव्हा झाला तेव्हा आमच्या

कुटुंबासाठी त्यांनी त्यांच्या शेजारच्या बंगल्याच्या आवारातील छोटे बैठे घर आम्हाला परवडेल अशा भाड्यात मिळवून दिले. विनया, मी, नुपूर ५ वर्षे त्यांचे सख्खे शेजारी म्हणून राहत होतो. या काळात एकीकडे त्या माझ्यासारख्या नव्या कार्यकर्त्याकडून छोट्या पुस्तिका वा त्यांचे पुनर्लेखन करवून घेत होत्या, तर दुसरीकडे ज्येष्ठ मार्क्सवादी अभ्यासक मराठीमध्ये मार्क्सच्या 'दास कॅपिटल'चा परिचय करून देणारा ग्रंथ लिहीत होतो, त्यात त्या संपूर्णपणे लक्ष घालत होत्या. या कामासाठी आर्थिक पाठबळ देत होत्या. ज्येष्ठ डाव्या कार्यकर्ते जोडप्याला स्वत:च्या बंगल्यात सोय करून देणे, साताऱ्याच्या आपल्या आजोळच्या बंगल्यात तिथल्या डाव्या कार्यकर्त्यांची सोय करणे, हे त्यांनी अगदी अलीकडेपर्यंत केले. विविध अभ्यासप्रकल्पात गुंतवून वा आपल्या कामात साहाय्यक म्हणून घेऊन अनेक कार्यकर्त्यांना त्यांनी आर्थिक आधार दिला. काही वेळा या मदतीचा नीट वापर गेला नाही वा त्यांच्याकडून कर्जाऊ घेतलेल्या रकमा काही वेळा परत आल्या नाहीत. पण तरीही मदत करण्याचे काम त्यांनी चालू ठेवले. १९८८ मध्ये विनयाने आमच्यासाठी छोटा ब्लॉक विकत घ्यायचे नियोजन केले, ती नोकरी करत होती पण बँकेतून कर्ज मिळणे अवघड होते आणि आमच्याकडे काहीच पैसे नव्हते. सर्व पैसे कर्जाऊ उभे केले. सुलभाताईंनी एक मोठी रक्कम दिली आणि सांगितले,"पैसे परत देण्याचे हिशोब तुम्हीच ठेवायचे." पुढे काही वर्षे दरमहा मी रक्कम नेऊन देत होतो आणि शेवटी साऱ्या हिशेबाची नोंद असलेले एक स्टेटमेंटही त्यांच्याकडे दिले. पण त्यांनी एकदाही दिलेले पैसे किती आहेत हे मोजले नाही आणि शेवटच्या त्या स्टेटमेंटकडे नजरही टाकली नाही!

लोकविज्ञान संघटनेपासून (१९८०) आताच्या लोकायतपर्यंत अनेक उपक्रमांना-संघटनांना त्यांनी नेहमीच जागा वापरायला दिली. आधार दिला. स्वत:चा जुना बंगला, तो तसाच ठेवून त्यावर मोठी इमारत बांधताना त्यात काढलेली दोन चांगली सभागृहे समाजप्रबोधनाचे उपक्रम व सांस्कृतिक कार्यक्रम यासाठी राखीव ठेवली. गेली ३५ वर्षे त्यांनी ज्या पुस्तिका काढल्या त्यांचा निर्मितीखर्च परत येवो अथवा न येवो, ती विकणाऱ्या कार्यकर्त्यांकडून त्या रकमा परत येवो वा न येवो, स्वत:चे सर्व बौद्धिक आणि आर्थिक बळ त्यांनी या कामासाठीच सतत वापरले.

त्यांच्याशेजारी राहायला गेल्यावर जाणवली ती त्यांची साधी राहणी. गोखले अर्थशास्त्र संस्थेत त्या प्रपाठक (रीडर) पदावर काम करत होत्या, पण त्यांच्या अंगावर अत्यंत साध्या सुती साड्या असत. त्यांच्या आई प्रतिलाताई नऊवारी साड्या नेसत, त्या त्यांनी वापरातून बाजूला काढल्या की छोट्या करून (पाच-सहा वारी) सुलभाताई त्या वापरत. अलीकडच्या काळात एका कार्यकर्तीशी बोलता बोलता त्या म्हणाल्या की आता वयामुळे भरड सुती साड्यांचा त्वचेला त्रास होतो. त्या कार्यकर्तीने स्वत:च्या मऊ सुती साड्या आणून दिल्या आणि सुलभाताई त्या रंगीबेरंगी, छान साड्या नेसू लागल्या. काही वर्षांपूर्वी शेजारी नवा छोटा बंगला बांधून, त्या तिकडे राहायला गेल्या. पण शेवटच्या क्षणापर्यंत त्यांच्या या नव्या घरातही अत्यंत साधे, जुने, कॉट-कपाट एवढेच लाकडी फर्निचर (?), मोजकीच भांडीकुंडी आणि इलेक्ट्रॉनिक गॅजेट्स नसलेले स्वयंपाकघर आणि घरभर पुस्तके व कागदपत्रे एवढेच होते. फक्त अलीकडच्या काळात पुस्तकनिर्मितीसाठी संगणक आले. अशा साध्या राहणीतून वाचवलेली सर्व संसाधने सामाजिक कार्यासाठी-चळवळीसाठीच त्यांनी वापरली.

सुलभाताई साधारण १९६५ पासून अकादमिक आणि सामाजिक कार्यात क्रियाशील झाल्या, ते शेवटपर्यंत त्या क्रियाशील राहिल्या. त्यांचे अव्याहत चालणारे काम आणि त्यांची अथक क्रियाशीलता ही आसपासच्यांनाही क्रियाशील करत राहिली. त्यांची क्रियाशीलता गेली ५० वर्षे सर्वांनाच प्रेरणा आणि ऊर्जा देणारी राहिली. ही बहुआयामी क्रियाशीलता त्यांच्या स्त्री म्हणून असलेल्या चतुरस्रपणातही रुजलेली होती.

सुलभाताईंचा जन्म साताऱ्याचा, १९३२ चा. मूळ कोकणचे असलेले गाडगीळ कुटुंब (आजोळ) नागपूरमध्ये स्थायिक झालेले. सुलभाताई या ख्यातकीर्त अर्थतज्ज्ञ, सहकार चळवळीच्या प्रवर्तकांपैकी एक, गोखले अर्थशास्त्र संस्थेचे संस्थापक आणि राष्ट्रीय नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. धनंजयराव गाडगीळ व समाजकार्य करणाऱ्या प्रमिला (मूळचे काळे) यांच्या कन्या. प्रसिद्ध पर्यावरणतज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ हे सुलभाताईंचे धाकटे बंधू. शालेय शिक्षणापासून डॉक्टरेट होण्यापर्यंत सारे विद्यार्जन सुलभाताईंनी पुण्यात केले. पुणे विद्यापीठातून अर्थशास्त्रात एम.ए. आणि गोखले अर्थशास्त्र संस्थेत पीएच.डी त्यांनी केली. याच संस्थेत त्या प्रपाठक (रीडर) व नंतर काही काळ रजिस्ट्रार होत्या. या संस्थेत त्या १९५९ ते १९९२ या काळात काम करत होत्या. त्यापूर्वी १९५८ मध्ये लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये त्यांनी डॉक्टरेटनंतरचा संशोधन-अभ्यास केला. तसेच १९६६ मध्ये सोव्हिएत संघात (रशिया) प्रादेशिक व नागरी नियोजनावर आणि पुढे यूएसए (अमेरिका) मध्ये हार्वर्ड विद्यापीठात नियोजनावर विशेष अभ्यास केला. दुसरीकडे त्या बँक ऑफ महाराष्ट्राच्या संचालक मंडळाच्या सदस्य (१९७२-७७) या काळात होत्या. त्यांनी गोखले अर्थशास्त्र संस्थेच्या व्यवस्थापक मंडळाचे सदस्य म्हणूनही काम केले.

ही पार्श्वभूमी आणि त्यांचे अभ्यास/संशोधन कार्य लक्षात घेता गोखले अर्थशास्त्र संस्थेच्या संचालक बनणे त्यांना शक्य होते. पण त्या दिशेने 'करियर'चा विचार त्यांनी केला नाही. उलट, पुढे एका टप्प्यावर संस्थेचे कार्य हे तिच्या लौकिकाला साजेसे आणि उद्दिष्टांप्रमाणे व्हावे, ती सामाजिकदृष्ट्या महत्वाच्या विषयांवर संशोधन करणारी संस्था राहावी आणि तत्त्वांशी तडजोड करून तिचा दर्जा खालावू नये यासाठी संचालक व मंडळ यांच्याशी त्यांनी संघर्ष केला. तसेच संशोधक आणि संस्थेतील कर्मचारी यांना संघटित करून त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध निषेध, निदर्शने, संप या मार्गांनी त्यांनी आवाजही उठवला. संस्थेमध्ये व्यावसायिक नीतिमत्ता, दर्जा व न्याय टिकावा यासाठी त्या आग्रही राहिल्या.

मराठवाड्याची प्रादेशिक विकास योजना, पश्चिम महाराष्ट्रातील जमीनवापर, नागरीकरण व नागरी नियोजन, बदलती ग्रामीण अर्थव्यवस्था, ग्रामीण व प्रादेशिक नियोजन, दुष्काळ निर्मूलन व सिंचन नियोजन, अनुसूचित जाती-जमातींसाठी आर्थिक नियोजन, शेती-ऊर्जा-औद्योगिक क्षेत्रांचे नियोजन, अशा महत्वपूर्ण विषयांवर त्यांनी अभ्यास, धोरणसमीक्षा, नियोजनाची गरज आणि धोरणात्मक पर्याय यांची मांडणी केली. त्याआधी साठीच्या दशकात भारतातील कापडाचे वितरण व उपभोग तसेच पानशेत पुराचे पुण्यावरील परिणाम व पुनर्वसन याही विषयांवर काम केले होते.

त्यांचे पती शंकर ब्रह्मे हे नामवंत स्थापत्यविशारद होते. त्यांच्या अकाली झालेल्या अपघाती निधनानंतर त्यांच्या स्मृतीसाठी १९६९ मध्ये 'शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालय' या संस्थेची स्थापना सुलभाताईंनी केली आणि दि. के. बेडेकर यांच्या बंगल्यात त्याचे काम सुरू केले. समाज प्रबोधनासाठी पुस्तके व प्रकाशने, अभ्यास व चर्चा, व्याख्याने व परिसंवाद आदी कार्य या संस्थेमार्फत करण्याचे उद्दिष्ट होते. याच जागेतून लोकविज्ञान संघटनेचे कार्य १९८० मध्ये सुरू झाले. सुलभाताई तिच्या संस्थापक सदस्यांपैकी एक होत्या. ऐंशीच्या दशकात त्या पुरोगामी महिला संघटना, 'बायजा' द्वैमासिक, नॅशनल बुक ट्रस्ट, 'तात्पर्य' मासिक, समाजविज्ञान अकादमी (ॲकॅदमी ऑफ पोलिटिकल ॲंड सोशल स्टडीज) या आणि अशाच विविध संस्थांच्या विश्वस्त व क्रियाशील सदस्य होत्या. स्वत:च्या संशोधन/अभ्यासाच्या विषयांवरील पुस्तकांव्यतिरिक्त सुलभाताईंनी महाराष्ट्रातील दुष्काळावर इंग्रजी (नंतर मराठीत) तसेच आनंद स्वरूप यांच्यासह 'प्लॅनिंग फॉर मिलियन्स : प्रॉब्लेम ॲंड प्रॉस्पेक्ट' अशी पुस्तके लिहिली. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या लेखाच्या तीन संग्रहाचे संपादनही केले.

नव्वदच्या आसपास अनेक बदल घडले. मंडल आयोग आणि भारताची परकीय गंगाजळीची 'दिवाळखोरी', सोव्हिएत रशिया आणि पूर्व युरोपमधील समाजवादी राजवटींची पडझड, गतिमान झालेले जागतिकीकरण

आणि भारतात घेतली गेलेली नवउदारमतवादी - 'मुक्त' बाजारपेठी आर्थिक धोरणे, बाबरी मशीद उदध्वस्त करून देशात माजवला गेलेला धर्मांध हिंसाचार, गॅट आणि डंकेल चर्चांचे उठलेले मोहोळ अशा घडामोडी १९८९ ते ९२ या काळात घडत होत्या. आणि याच काळात १९९२ मध्ये सुलभाताई गोखले अर्थशास्त्र संस्थेतून निवृत्त झाल्या.

आता सुलभाताईंनी पूर्णवेळ समाज प्रबोधनाच्या कार्यास वाहून घेतले. विविध मुद्द्यांना व समस्यांना प्रतिसाद, प्रतिकार व पर्याय देताना त्यांचा मुख्य भार हा जनजागृती करण्यावर राहू लागला. अभ्यासप्रकल्प वा संशोधनप्रकल्पांपेक्षा अभ्यासपूर्ण मांडणी करणाऱ्या पुस्तिका आणि संयुक्त कृती याकडे त्यांनी अधिक लक्ष केंद्रित केले. त्यांनी लिहिलेल्या सुमारे पन्नासेक पुस्तिकांपैकी बहुसंख्य पुस्तिका या गेल्या २५ वर्षांतील म्हणजे जागतिकीकरणाच्या पर्वातील आहेत. जागतिकीकरण, बहुराष्ट्रीय कंपन्या, एन्रॉन, कोकणविकास, तेल व डिझेल, गॅट-पेटंट, बेरोजगारी, अणुयुद्ध, लोकसंख्या, गुजरातकांड, महागाई, शेती व शेतकरी समस्या, दहशतवाद, इंग्रजी माध्यम, साम्राज्यवाद, काश्मीर, गोवंश प्रश्न, भूकंप व पुनर्वसन, दुष्काळप्रश्न अशा अनेकविध समस्यांना त्यांनी हात घातला. सुस्पष्ट वैचारिक भूमिका, परखड चिकित्सा, आकडेवारीसह विश्लेषण आणि पर्यायी उपायांची दिशा अशा सर्व अंगांचा प्रत्यय या पुस्तिकांमधून येतो. याशिवाय रा. प. नेनेंसह त्यांनी लिहिलेली 'महाराष्ट्रातील शेतमजूर', सुधीर बेडेकर, नेने यांच्यासह लिहिलेली व दत्ता देसाई यांनी भर घालून, पुनर्लेखन केलेली 'हिंदू-मुस्लीम तणाव व भारतीय एकात्मता'च्या दोन आवृत्त्या, या पुस्तिकांचे प्रकाशन त्यांनी केले.

याशिवाय अनेक नियतकालिके व वृत्तपत्रे यामधून वेळोवेळी अभ्यासपूर्ण लेख त्यांनी लिहिले.

सुलभाताई या अर्थशास्त्रातल्या तज्ज्ञ होत्या, पण त्या प्रचलित-प्रस्थापित स्वरूपाच्या 'अर्थतज्ज्ञ' नव्हत्या. त्यांच्या अभ्यासाचा, लेखनाचा आणि संपूर्ण कार्याचा-संघर्षाचा मुख्य भार हा 'विकासाचे राजकारण' यावर राहिला. अर्थात, त्यांना विकास हा प्रचलित अर्थाचा नव्हे तर आमूलाग्र नव्या स्वरूपाचा अभिप्रेत होता, आणि त्याचे 'राजकारण' हे मूलभूत अर्थाचे क्रांतिकारी राजकारण हवे ही त्यांची ठाम भूमिका होती. या विकासकारणात त्यांना भाषा, संस्कृती, धर्म व धर्मनिरपेक्षता आणि पर्यावरण अशा सर्व बाबींचा जैव-एकात्मिक अर्थ अभिप्रेत होता. त्याअर्थी त्या व्यापक 'समाजवैज्ञानिक' होत्या. पण त्या प्रचलित समाजविज्ञानांची चिकित्सा करून पलीकडे जाऊन पाहणारा मार्क्सवादी दृष्टीकोन ठेवणाऱ्या होत्या हे लक्षात घेतले पाहिजे. त्यांना निसर्गविज्ञाने, कला, संगीत यात रसही होता आणि चळवळीतले व परिवर्तनाच्या संदर्भातले त्यांचे महत्त्वही त्या जाणत होत्या. त्यामुळे त्या एका समग्र दृष्टिकोनाचे आणि नव्या समाजवादाचे भान असलेल्या अशा क्रांतिकारी समाजवैज्ञानिक होत्या.

अभ्यासक म्हणून त्या व्यक्तिनिरपेक्ष व 'वस्तुनिष्ठ' पद्धतीने मांडणी करणाऱ्या होत्या पण प्रचलित पद्धतीच्या तथाकथित 'तटस्थ', 'अलिप्त', 'नि:पक्षपाती' अर्थी त्या वस्तुनिष्ठ नव्हत्या. तर स्पष्ट 'पक्षपाती' भूमिका त्या आयुष्यभर घेत राहिल्या. न्यायाची आणि समतेची, लोकशाहीची आणि मानवतेची, शांततेची आणि सहकार्याची बाजू त्यांनी घेतली. विस्थापित, शोषित, उपेक्षित, दलित आणि वंचित जनतेची, दुष्काळग्रस्त, कामगार, श्रमिक, शेतकरी, मजूर, आदिवासी यांची बाजू त्यांनी त्यांच्या कामातून आणि विचारातून लावून धरली. हे करताना तत्त्वनिष्ठ, वैज्ञानिक आणि क्रांतिकारक भूमिका त्यांनी सतत लावून धरली. त्यामुळेच त्या स्त्रीपुरुष समतेसाठी सतत झटल्या मात्र एकांगी-संकुचित भूमिका न घेता अर्थकारण-राजकारण-संस्कृतीसह व्यापक 'स्त्रीवादी' भूमिकांचे प्रतिपादन त्यांनी केले. वैयक्तिक आचरणापासून सैद्धान्तिक पातळीपर्यंत, 'लोकायत ग्रामीण विकास संस्थे'च्या माध्यमातून सेंद्रिय शेतीत प्रयोग करण्यापासून एकंदर धोरणात्मक पातळीवर शाश्वत-स्वावलंबी शेतीची बाजू लढवण्यापर्यंत आणि पर्यावरणवादी-पर्यायी विकासवादी चळवळींमध्ये सहभागी होण्यापर्यंत सर्व ते प्रयत्न त्या अखेरपर्यंत करत राहिल्या. पर्यावरणीय पैलूंविषयी त्या अत्यंत सजग होत्या. इथेही त्यांनी पर्यावरणाचा प्रश्न व्यापक भांडवली राजकीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात बघण्याची दृष्टी ठेवली आणि एका नव्या समाजवादाकडे जाण्यातूनच यावर कायमस्वरूपी उपाय शक्य होतील असा विश्वास त्यांनी ठेवला. भारतात जातिनिर्मूलन हा आपल्या परिवर्तन लढ्याचा अविभाज्य भाग आहे याची जाणीव त्यांना होती आणि १९७२-७४ च्या दुष्काळाच्या समस्येप्रमाणेच त्याच काळातील दलित पँथरच्या उठावाचे प्रतिबिंब त्यांचा मन:पटलावर उमटले होते ते शेवटपर्यंत टिकून होते. त्यामुळेच त्यांनी 'पँथरचा जाहीरनामा : काल-आज' ही पुस्तिकाही लिहिली होती.

मात्र लिंगभावभेद, पर्यावरण, जातप्रश्न यावर त्यांनी दिलेला भर कमी-अधिक राहिला, तो पुरेसा नसल्याचे असमाधान अनेक कार्यकर्त्यांनी वा प्रवाहांनी व्यक्त केले. तसेच या बाबींचा उहापोह त्यांनी अनुभवनिष्ठ आणि प्रत्यक्ष व्यवहार व कृतीच्या पातळींवर केला. सैद्धांतिक पातळीवर तो केला नाही असेही दिसते. पण त्याचे कारण समोर आलेल्या आव्हानांना प्रत्यक्षात प्रतिसाद व पर्याय दिले पाहिजे ही भूमिका आणि 'प्राधान्य कशाला द्यायचे?' असा प्रश्न त्यांच्यासमोर असावा. दोन वर्षांपूर्वी मी मार्क्सविचारावर अभ्यास व लेखनप्रकल्प हाती घेतला असून काही पुस्तकांचे लेखन चालू आहे असे त्यांना सांगितल्यावर 'अहो आता ते कुठे करताय?' दुष्काळापासून धर्मनिरपेक्षतेपर्यंत किती प्रश्न आपल्यासमोर आहेत. त्यावर काहीतरी करा ना!' अशी त्यांची प्रतिक्रिया होती त्याचे हेच कारण असावे.

उपचारपद्धती व आरोग्य, तंत्रज्ञान व शेती, धर्म पर्यावरण याबाबत त्या यांत्रिक विवेकवादी वा ठोकळेबाज 'आधुनिकता'वादी नव्हत्या. तर परंपरा व आधुनिकता यांचा खऱ्या अर्थी वैज्ञानिक विचार त्या करत असत. त्यांना पटणाऱ्या कल्पना व भावलेल्या तत्त्वांबद्दल त्या आग्रही जरूर असायच्या. मात्र एक तर नव्या विचारांबद्दल व माहितीबद्दल त्यांचे औत्सुक्य

शेवटपर्यंत कायम होते आणि दुसरे म्हणजे त्या आग्रही म्हणजे 'संकुचित' वा 'पंथवादी' वृत्तीच्या नव्हत्या. त्यामुळेच त्यांचा विविध विचारांचे कार्यकर्ते, राजकीय प्रवाह व प्रयोगकर्ते यांच्याशी मुक्त संवाद होत असे. त्यांनी अनेक मंचांशी जोडून काम केले. 'महाराष्ट्र राज्य दुष्काळ निवारण व निर्मूलन मंडळा'पासून ते 'जागतिकीकरणविरोधी मंचा'पर्यंत विविध ठिकाणी त्या क्रियाशील होत्या. त्या स्वत: पुढाकार घेऊन अनेक राजकीय कार्यकर्ते, नेते व पक्ष-संघटना यांच्याशी संपर्क करत. कृतींबद्दल विचारणा करत, जाणीव करून देत. यात अनेकदा त्या 'अभ्यासक-प्रबोधक'च्या पलीकडे 'संघटका'च्या भूमिकेत जात. त्यातून 'संघटनां'च्या समोर क्वचित काही प्रश्नही उभे होत. मात्र याचे एक कारण असे दिसते की, जे प्रश्न वा ज्या जागा खरे तर व्यापक, लवचिक, गतिमान व क्रियाशील पद्धतीने संघटनांनी हाताळायला हव्यात त्या 'रिकाम्या' राहत असल्याने 'व्यक्तींना' वा 'संस्थांना' तिथे अधिक क्रियाशील होण्याची गरज पडते असे गेली काही दशके दिसते आहे. या विशिष्ट कोंडीच्या अवस्थेत मार्ग काढण्याची धडपड सुलभाताईंच्या प्रयत्नांमधून समोर येते असेच म्हणावे लागते.

हीच धडपड त्या शेवटपर्यंत करत राहिल्या. माणसांना आत्मिक-नैतिक पर्याय देणाऱ्या 'मुक्त मानव मंचा'ची त्यांची अगदी अलीकडची कल्पना, मृत्यूपूर्वी अगदी चारच दिवस 'नोटाबंदी'च्या 'अविवेकी' व जनसामान्यांना भरडून काढणाऱ्या निर्णयावर त्यांनी लिहिलेला टीकात्मक लेख आणि नियोजन विमानतळ प्रकल्पामुळे विस्थापित होणाऱ्या पुरंदरमधील गावांना त्यांनी दिलेली भेट ही याची काही उदाहरणे... गेले महिनाभर तब्येतीच्या तक्रारी असतानादेखील त्यांचे अथक प्रयत्न अखेरपर्यंत सुरू होते. हे प्रयत्न अनेक अंगांनी, अनेक व्यक्ती-संस्था, संघटनांनी पुढे नेणे हीच त्यांना दिलेली आदरांजली ठरेल.

***(परिवर्तनाचा वाटसरू /१६ ते ३१ डिसेंबर २०१६)***

# नवउदारवादी धोरणे आणि बुरसटलेल्या विचारसरणीचा सामना करा!
# लोकशाही आणि धर्मनिरपेक्षतेचे रक्षण करा !
# जनवादी महिला संघटनेच्या ११व्या राष्ट्रीय अधिवेशनाची हाक

**प्राची हातिवलेकर**

अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेचे ११वे राष्ट्रीय अधिवेशन दि. १० ते १४ डिसेंबर २०१६ दरम्यान युनियन कार्बाईड कंपनीने उध्वस्त केल्यावरही फिनिक्स पक्ष्याप्रमाणे राखेतून पुन्हा उभ्या राहिलेल्या भोपाळ शहरात पार पडले.

खास अधिवेशनाकरता म्हणून भारताच्या चार दिशांतून महिलांच्या प्रमुख मागण्या घेऊन निघालेले चारही जथ्थे तसेच २३ राज्यांतून १ कोटी ८ लाख ४४ हजार सभासदांचे प्रतिनिधित्व करणारे ७८८ प्रतिनिधी येऊन थडकल्यावर दसरा मैदानातील जाहीर सभेने अधिवेशनाची सुरुवात झाली.

## जाहीर सभा

या सभेचे प्रमुख आकर्षण होते केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयन. मात्र त्यांच्या लोकप्रियतेचा मध्य प्रदेशात सत्तेवर असलेल्या भ्रष्ट भाजप सरकारने इतका धसका घेतला की बजरंग दलासारख्या धर्मांध व घातपाती कारवायांत निपुण असलेल्या संघटनेने त्यांच्यावर हल्ला करण्याची उघड धमकी देऊनही, राज्य सरकारने विजयन यांना कुठलीही सुरक्षा देण्यास सपशेल नकार दिला. अर्थात या धमकीला न जुमानता केरळचे मुख्यमंत्री जाहीर सभेला उपस्थित राहिले.




**राजकीय अहवालावर बोलताना रेहाना शेख व लहानी दौडा**

आपल्या भाषणात त्यांनी केंद्र सरकारच्या महिलाविरोधी धोरणांवर बोट ठेवत धर्मांध व जातीय हल्ले वाढत असून त्यात महिला व विशेषत: दलित, अल्पसंख्यांक महिला सर्वाधिक बळी पडत असल्याची वस्तुस्थिती मांडली. महिला आरक्षणावर केंद्र सरकार मूग गिळून बसले असून, भाजपची सत्ता असलेल्या राजस्थान, हरियाणा सारख्या राज्यांनी तर ८० टक्के महिला निवडणूक लढवण्यापासून वंचित राहतील असे कायदे केले असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

या जाहीर सभेत, हैद्राबाद विद्यापीठाने आणि भाजप सरकारने बळी घेतलेल्या रोहित वेमुलाची आई राधिका वेमुला यांचेही भाषण झाले. न्यायासाठी त्यांना द्याव्या लागलेल्या लढ्याचे वर्णन करून दलित व श्रमिक यांच्या लढ्याचे ध्येय एकच असल्याचे त्या म्हणाल्या. जमसंचे हे अधिवेशन दलित व इतर लोकशाहीवादी शक्तींची एकजूट उभारण्यात सहाय्यक ठरेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या सभेत जमसंच्या अखिल भारतीय अध्यक्षा मालिनी भट्टाचार्य, उपाध्यक्षा सुभाषिनी अली व सरचिटणीस जगमती सांगवान यांचीही भाषणे झाली. मध्य प्रदेश जमसंच्या नेत्या संध्या शैली व नीना शर्मा यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

## प्रेरणादायक उद्घाटन सत्र

दुसऱ्या दिवशी शाॲमली गुप्ता नगरात अधिवेशनाच्या कामकाजाला रीतसर सुरुवात झाली. प्रचंड उत्साहात व घोषणांच्या गजरात मालिनी भट्टाचार्य यांनी ध्वजारोहण केले. अध्यक्षमंडळ व सर्व प्रतिनिधी स्थानापन्न झाल्यावर अधिवेशनाच्या खुल्या सत्राला सुरुवात झाली. सत्राच्या सुरुवातीला स्वागत समितीचे अध्यक्ष व केंद्र सरकारच्या जनविरोधी धोरणांचा निषेध म्हणून आपले पुरस्कार परत करणारे प्रसिद्ध कवी व साहित्यिक राजेश जोशी यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. अत्यंत रोचक रीतीने भोपाळ या मध्य प्रदेशच्या राजधानीला असलेला लोकसंघर्षाचा इतिहास त्यांनी सांगितला. महिला नबाबांनीही इथे राज्य केल्याचे सांगून, अशा नगरीत हे महिला अधिवेशन नक्कीच यशस्वी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अधिवेशनाचे उद्घाटन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या धडाडीच्या तरुण नेत्या मुक्ता दाभोलकर यांच्या हस्ते झाले. आपल्या छोटेखानी पण प्रभावी भाषणात त्यांनी त्यांचा अंधश्रद्धा निर्मूलनाचा लढा व जमसंचा महिला अधिकारांकरिता लढा हे परस्परपूरक असल्याचे सांगितले. जमसं महिलांच्या हक्काकरता रोज करत असलेला संघर्ष ही देशभक्तीच असून, आम्हाला ती कोणी शिकवायची गरज नाही, असे सूचक उद्गार त्यांनी काढले. डॉ. दाभोलकर, कॉ. पानसरे तसेच डॉ. कलबुर्गी यांच्या हत्येचा आजही तपास लागला नसून, हे सरकार हिंदू दहशतवाद अस्तित्वात असल्याचे मान्यच करायला तयार नाही, ही मोठी शोकांतिका असल्याचे त्या म्हणाल्या.

यानंतर जमसंच्या सल्लागार वृंदा करात यांचे मार्गदर्शनपर भाषण झाले. संघटनेच्या लढाऊ परंपरेची व संस्थापक नेत्यांनी केलेल्या त्यागाची आठवण करून देत, त्यांनी अधिवेशनात कुठल्या विषयांवर व प्रश्नांवर चर्चा होणे आवश्यक आहे ते सांगितले. नवउदारवादी धोरणे व धर्मांध शक्तींविरुद्ध लढण्याकरता ठोस उपाय या अधिवेशनातून पुढे येतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या अधिवेशनात प. बंगालमधील सत्ताधारी तृणमूल काँग्रेसच्या गुंडांनी मतदान करण्यास जाऊ नये म्हणून केलेल्या मारहाणीला पुरून उरलेल्या देबश्री घोष, उत्तर प्रदेशातील धावत्या गाडीत सामुहिक बलात्कार झालेली आशियाना केस महिला, आंध्र प्रदेशातील प्रदूषण मुक्ती आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या अरेती सथ्यावती, कौटुंबिक हिंसाचाराला व पोलिसांच्या दबावाला बळी न पडता ताठ मानेने उभ्या असलेल्या हरियाणाच्या संतोष या धीरोदात्त महिलांचा सत्कार करण्यात आला. या सर्व जणींनी अंगावर शहारे आणणारे आपले अनुभव यावेळी कथन केले. कुठल्याही राजकीय, सामाजिक दबावाला बळी न पडता जमसंने त्यांना जी साथ दिली, त्यामुळेच लढण्याला बळ आले, असे या सगळ्यांनी आवर्जून सांगितले.

विविध भ्रातृभावी जनसंघटनांचे नेतेही या अधिवेशनाला शुभेच्छा

देण्याकरता आवर्जून उपस्थित होते. यांत सीटूचे माजी अध्यक्ष ए के पद्मनाभन, अखिल भारतीय शेतमजूर युनियनचे सरचिटणीस ए. विजयराघवन, अखिल भारतीय किसान सभेचे सहसचिव एन के शुक्ला, डीवायएफआयचे अध्यक्ष खासदार एम बी राजेश, एसएफआयचे अध्यक्ष व्ही. पी. शानू हे नेते उपस्थित होते. सर्व नेत्यांनी आपापल्या भाषणात जनवादी महिला संघटनेने उभारलेल्या चळवळीचे कौतुक करून, त्यांच्या प्रत्येक लढ्यात आमच्या संघटना मनःपूर्वक साथ देतील, असे आवर्जून सांगितले.

### अहवाल व चर्चा

यानंतर आंतरराष्ट्रीय व देशांतर्गत परिस्थितीवर अनुक्रमे मालिनी भट्टाचार्य व अखिल भारतीय सचिव किरण मोघे यांनी अहवाल मांडला. या अहवालावरील चर्चेत २५ प्रतिनिधींनी भाग घेतला. चर्चेचा रोख आंतरराष्ट्रीय महिला चळवळीशी आपण संबंध दृढ केले पाहिजेत, कारण महिलांवरील अत्याचार केवळ भारतातच नव्हे तर जगभरात वाढत असून, धर्मांध शक्ती सगळीकडेच डोके वर काढत असल्यामुळे महिला अधिकच असुरक्षित होतील, असा होता. प्रतिनिधींनी नवउदारवादी व धर्मांध शक्तींविरुद्ध लढताना येणाऱ्या अडचणी विशेषत: रेशन व्यवस्थेतील अंदाधुंदी, वाढत्या बेरोजगारी व महागाईचे संकट, नोटाबंदीमुळे महिलांवर आलेली संक्रांत, दलित व अल्पसंख्यांकांवरील अत्याचाराचे गुन्हे नोंदवताना येणाऱ्या अडचणी देखील विस्ताराने मांडल्या.





**संघटनात्मक अहवालावर बोलताना हिराबाई घोंगे आणि प्राची हातिवलेकर**

या अहवालावरील चर्चेत जमीनधारणा, वनाधिकार, कुपोषण यावरील सरकारी धोरणांवर लहानी दौंडा यांनी तर अन्न सुरक्षा, तीन तलाक, अल्पसंख्यांक महिला या प्रश्नांचा राज्यातील महिलांवर कसा विपरीत परिणाम होतो हे रेहाना शेख यांनी महाराष्ट्राच्या वतीने मांडले.

जमसंच्या सरचिटणीस जगमती सांगवान यांनी मांडलेल्या कार्याच्या व संघटनात्मक अहवालावर एक संपूर्ण दिवस चर्चा झाली. राज्याच्या वतीने महिलांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर राज्यात जी आंदोलने झाली त्याविषयीचे अनुभव हिराबाई घोंगे यांनी, तर महाराष्ट्राने ओलांडलेला एक लाख सभासदसंख्येचा आकडा, आणि त्याच प्रमाणात महिलांना आंदोलनात उतरवण्याचे प्रयत्न व इतर संघटनात्मक मुद्दे प्राची हातिवलेकर यांनी मांडले.

केरळ राज्याने पार केलेला ५० लाख सभासदनोंदणीचा आकडा व अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत प. बंगालमध्ये पाय रोवून उभ्या असलेल्या जमसंच्या हिकमती कार्यकर्त्या ह्या या चर्चेचा उत्कर्ष बिंदू होत्या. ईशान्येकडील आसाम, मणिपूर सारख्या आकाराने लहान पण वाढत्या फुटीरतावादी शक्तींविरुद्ध चिवट झुंज देणाऱ्या कार्यकर्त्यांचे अनुभवही थक्क करणारे होते. उत्तरेकडील पंजाब, हरियाणा, राजस्थान या राज्यांत तर भाजपची सरकारे असल्यामुळे प्रतिगामी, धर्मांध शक्तींनी उच्छाद मांडला आहे. महिलांना दुय्यम व तुच्छ लेखणाऱ्या या राज्यांत जमसंच्या कार्यकर्त्या कशी संघटना उभारीत आहेत व आंदोलने करीत आहेत, हे तेथील कार्यकर्त्यांनी मांडलेल्या अनुभवांमुळे प्रकर्षाने सभागृहापुढे आले. एक कोटीच्या वर सभासदसंख्येसहित जरी आपली संघटना ही भारतातील सर्वात मोठी महिला संघटना असली, तरी देखील अनेक संघटनात्मक उणीवा आपल्यात आहेत, त्यावर मात केली पाहिजे, हा या चर्चेचा सारांश होता.

अहवाल मांडणाऱ्या नेत्यांनी तीनही अहवालांवरील चर्चेला समर्पक उत्तरे दिल्यानंतर हे अहवाल एकमताने मंजूर झाले.

### ठराव व कमिशन्स

देशाची एकूण राजकीय परिस्थिती व तिचा महिलांवर होणारा थेट परिणाम यासंबंधी अनेक ठराव या अधिवेशनाने मंजूर केले, ते असे : महान ऑक्टोबर क्रांतीच्या शतकमहोत्सवी वर्षानिमित्त; लिंग-समान कायदे व तीन-तलाक विषयक; प्रतिष्ठेपायी केल्या जाणाऱ्या हत्यांच्या निषेधार्थ; नोटाबंदीच्या विरोधात; शहरी महिलांना पुरविण्यात येणाऱ्या अत्यावश्यक नागरी सुविधांविषयी; बुरसटलेली विचारसरणी व प्रतिगामी धोरणांच्या विरोधात व शास्त्रीय दृष्टीकोनाच्या समर्थनार्थ; प्रसूतिविषयक अधिकारांसंबंधी; प. बंगाल राज्यात सुरू असलेला राजकीय हिंसाचार व महिलांच्या लोकशाही हक्कांच्या पायमल्लीचा तीव्र निषेध; छत्तीसगड राज्यातील आदिवासी महिलांच्या समर्थनार्थ आणि मध्य प्रदेश मधील महिलांच्या ज्वलंत प्रश्नांविषयी; असे विविध ठराव अधिवेशनाने एकमताने संमत केले.

अखिल भारतीय अधिवेशनाचे निमित्त साधून विविध विषयांवरील सात कमिशन पेपर्स केंद्रीय कमिटीने तयार केले होते. अधिवेशनाच्या सुरुवातीलाच प्रतिनिधींना त्यांचे वाटप करण्यात आले. स्थानिक स्वराज्य संस्थांत महिलांचे ढासळते स्थान; राष्ट्रीयत्व; मालमत्ता व जमीन विषयक महिलांचे अधिकार; असंघटित क्षेत्रातील महिला कामगार; देहव्यापार व वेश्याव्यवसाय; व्यसनमुक्तीचा लढा आणि पर्यावरण व महिला अशा विविध विषयांवर गटनिहाय चर्चा करण्यात आली. सर्वच महिला प्रतिनिधींनी आपल्या तळागाळातील कामाच्या अनुभवांवर आधारित अत्यंत मोलाची भर या पेपर्समध्ये घातली. प्रत्येक गटचर्चेचा गोषवारा गटनेत्यांनी सभागृहापुढे सादर केला.

सीटू या बलाढ्य कामगार संघटनेच्या नुकत्याच झालेल्या अधिवेशनात कामगार नेत्या हेमलता यांची अखिल भारतीय अध्यक्ष म्हणून निवड झाली. या अत्यंत आव्हानात्मक पदावर प्रथमच एका महिलेची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांची अल्पकाळाची उपस्थिती व भाषण फारच स्फूर्तिदायक ठरले.

### नवीन नेतृत्व

शेवटच्या सत्रात ९९ सदस्य व १२ विशेष आमंत्रितांची नवीन केंद्रीय कमिटी निवडण्यात आली. या कमिटीने एकमताने मालिनी भट्टाचार्य यांची अध्यक्ष म्हणून, तर पी के श्रीमती यांची कोषाध्यक्ष म्हणून फेरनिवड केली. महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्युच्च आनंदाचा क्षण म्हणजे राज्याच्या अध्यक्ष मरियम ढवळे यांची अखिल भारतीय सरचिटणीसपदी एकमताने झालेली निवड! एकूण १५ उपाध्यक्ष, महाराष्ट्राच्या किरण मोघे सहित ८ सचिव व ६ सहसचिव असे एकूण ३२ जणांचे केंद्रीय सचिव मंडळ यावेळी निवडण्यात आले. केंद्रीय कमिटीवर महाराष्ट्रातून राज्य सचिव सोन्या गिल यांची फेरनिवड झाली, तर नसीमा शेख व लहानी दौंडा यांची नव्याने निवड झाली.

यानंतर नवनिर्वाचित सरचिटणीस मरियम ढवळे यांचे संघटनेसमोर असणारी राजकीय व संघटनात्मक आव्हाने मांडणारे व पुढील काळातील आंदोलनाची दिशा देणारे स्फूर्तिदायक भाषण झाले. मालिनी भट्टाचार्य यांनी केलेल्या आभारप्रदर्शनानंतर टाळ्या व घोषणांच्या गर्जनेत या ११व्या अखिल भारतीय अधिवेशनाची अत्यंत यशस्वी सांगता झाली.

*(पान ६ पहा)*

# मराठी कथेची मूलगामी चर्चा

डॉ. दीपक बोरगावे

मराठी कथेवर आजवर विपुल समीक्षा लिहिली गेली आहे. कथाकार जी. के. ऐनापुरे यांचे 'मराठी कथा : मूल्य आणि ऱ्हास' हे अलीकडेच प्रसिद्ध झालेले नवे पुस्तक यासंदर्भात महत्त्वाचे ठरावे. मार्क्सवादी दृष्टिकोनातून मराठी कथेचे मूल्यमापन करताना बुद्ध-फुले-आंबेडकरी प्रभावाचाही त्यांनी मागोवा घेतला आहे. ऐनापुरेंनी मराठी कथेचा १६० वर्षांचा प्रदीर्घ पट मांडण्याचा प्रयत्न या पुस्तकात केला आहे. भारतात मौखिक परंपरेतून सुरू झालेली कथा ही मराठीत छापील स्वरूपात १८५४ साली अवतरली. ज्ञान, शिक्षण, जतन परंपरा, श्रेष्ठत्वाचा इतिहास हा नेहमी ब्राह्मणी साहित्याच्या बाजूने राहिला आहे. या गोष्टी समजावून घेण्याची मानसिकता आज मराठी समीक्षेची राहिलेली नाही, ही ऐनापुरेंची तक्रार आहे.

मराठी साहित्याची विभागणी साहित्यमूल्यांसाठी लढणारे आणि ही मूल्ये अदृश्य ठेवण्याची कसरत करणारे अशा दोन गटांत करता येते. यातील दुसरा गट मराठीच काय, साऱ्या भारतीय साहित्यावर आपले वर्चस्व टिकवून आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या साहित्याचा ब्राह्मणी साहित्य म्हणून पुन:पुन्हा उल्लेख केला, त्याच आवर्तनात आजचे मराठी साहित्य अडकलेले आहे. मनुस्मृती, वेद, पुराणे, रामायण, महाभारत अशा अनेक ग्रंथ व उपग्रंथांत हे साहित्य विस्तारलेले आहे. यालाच धर्मशास्त्र म्हणण्याचा प्रघात पडला आणि या धर्मशास्त्रानुसार भारतीय समाजाने वर्तन करावे, असा आग्रह दुसऱ्या गटाचा आहे. समाजावर वर्चस्व कसे मिळवायचे व ते कसे टिकवायचे, याचे हे शास्त्र कोंदणात बसवले गेल्यामुळे त्यातून भारतीय मनाची सुटका करून घेणे अशक्यप्राय होऊन बसले आहे. दुसऱ्या गटातील साहित्यिक ही कसरत अनेक प्रकारे करताना दिसतात. चमत्कार, अद्भुतता, प्रयोगशीलता, धार्मिकतेचा आग्रह, जातवास्तव, सांस्कृतिक दहशतवाद, धर्मग्रंथांचे पठण, इतिहासाचा अपव्यय, उत्तरआधुनिकता, अंधश्रद्धा, अभ्यासक्रम, धर्मदाय संस्था या व अशा अनेक रूपांत ती विस्तारताना दिसते. भारतीय साहित्यावर ही मोहिनी आजही कायम आहे. पण याला फक्त ब्राह्मण समाजच जबाबदार आहे असे म्हणता येणार आहे.

मराठी कथेची चर्चा करताना ऐनापुरे यांनी तीन टप्पे गृहीत धरले आहेत. पहिला टप्पा ना. रा. शेंडे, श्री. म. माटे, पु. भा. भावे, व्यंकटेश माडूळकर, शंकरराव खरात, अण्णाभाऊ साठे, शंकर पाटील, जी. ए. कुलकर्णी, गंगाधर गाडगीळ व चारुता सागर असा आहे. दुसरा टप्पा भाऊ पाध्ये, बाबुराव बागूल, विलास सारंग, श्याम मनोहर, सखा कलाल, भारत सासणे आणि तिसरा टप्पा मेघना पेठे, प्रज्ञा दया पवार, आसाराम लोमटे, विजय जावळे, डॉ. अनिल सपकाळ, सिद्धार्थ देवधेकर आणि विजय तांबे असा आहे. हे तीन टप्पे गृहीत धरताना लेखकाची मनोवृत्ती, कथालेखनातील सातत्य, कालावकाश, साहित्यमूल्ये या गोष्टींचा विचार केला आहे. इथे ग्रामीण, दलित, नागरी अशी प्रमाणके गृहीत धरलेली दिसत नाहीत.

पहिल्या टप्प्यात माटेंचा अपवाद वगळता ब्राह्मणी साहित्याचा अधिक प्रभाव दिसतो. पु. भा. भावे, जी. ए. कुलकर्णी, श्री. दा. पानवलकर हे हिंदुत्ववादी व ब्राह्मणी परंपरा लावून धरणारे कथालेखक आहेत. व्यंकटेश माडगूळकरांसारख्या लेखकांनी ग्रामीण जीवनावर कथा लिहिली. पण ती किती ब्राह्मणी वळणाची होती हे ऐनापुरे दाखवून देतात. प्रा. गो. मा. पवारांसारखे समीक्षकही माडगूळकरांच्या लेखनाची भलावण करून स्वत:चा स्वार्थ कसा साधून घेतात, हे राजकारण तपशीलवार या पुस्तकात आले आहे. माडगूळकरांच्या लेखनात जातिव्यवस्थेच्या बाहेर जाण्याची किंवा प्रहार करण्याची क्षमता नाही. माडगूळकर आशयाला खेळवीत किंवा लढवीत नाहीत. महात्मा फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. आंबेडकर यांच्या जात-धर्मकलहाचा लवलेशही त्यांच्या कथांतून येत नाही. जातसंघर्ष, धर्मसुधारणा यांचा जाच त्यांच्या कथांतून कुठेही आढळत नाही. माडगूळकरांची संवेदनशीलता ही जातिव्यवस्थेवरच पोसलेली असल्याने त्यांचे लेखन हे महात्मा फुले, महर्षी शिंदे आणि डॉ. आंबेडकर यांच्या विचार व कृती-कार्यक्रमाच्या विरोधात जाणारी कृती आहे असा ऐनापुरे यांचा निष्कर्ष आहे.

३० एप्रिल १९४५ रोजी हिटलरचा झालेला अस्त आणि ३० जानेवरी १९४८ रोजी महात्मा गांधी यांची झालेली हत्या या विसाव्या शतकातील दोन महत्त्वाच्या घटनांचा जगभरातल्या साहित्यावर मोठा प्रभाव दिसतो. पण या पार्श्वभूमीवर मराठी कथेचे काय झाले? नवकथा म्हणून जे 'प्रॉडक्ट' १९६० च्या दरम्यान जन्माला आले, ते मध्यमवर्गीय ब्राह्मणी समाजापुढे गेले नाही. गंगाधर गाडगीळ यांचे 'किडलेली माणसे' हे त्याचे उत्तम उदाहरण म्हणता येईल. वर्चस्ववादी राजकारणाचे भक्ष्य ठरलेल्या गाडगीळांच्या क्षमता मोठ्या असूनही त्यांनी गिरगावात मध्यमवर्गीय म्हणून राहणे पसंत केले. ही त्यांची व त्यांच्या साहित्याची फार मोठी मर्यादा म्हणावी लागेल. त्यांच्या कादंबऱ्यांना सांस्कृतिक महत्त्व असताना त्यांच्याच समूहात त्या दुर्लक्षित राहिल्या. याउलट, भाऊ पाध्येंच्या कादंबऱ्या या उपेक्षित चाळसंस्कृतीचे परिणामकारक चित्रण करणाऱ्या संहिता त्यामानाने महत्त्वाच्या ठरल्या. गिरगावचे प्रतिनिधित्व करणारे गाडगीळ हे अर्थतज्ज्ञ असूनही ते गिरणगावाकडे – म्हणजे कामगारवर्गाकडे फिरकलेसुद्धा नाहीत. नवता, प्रयोग, आधुनिकता, फॅण्टसी, मंदिराचं राजकारण, दंतकथा अशा नवनव्या कटाचा आधार घेऊन सत्य लपवण्याचा प्रयत्न केला गेला. दलित साहित्याचा जन्म आणि काही काळासाठी त्याला दिला गेलेला आधार, महत्त्व हाही याच कटाचा भाग होता. ब्राह्मणी साहित्याचे महत्त्व टिकवून ठेवण्यासाठी जातव्यवस्था घट्ट झाली पाहिजे हा कावा यामागे होता, असे लेखकाचे निरीक्षण आहे.

गाडगीळांच्या प्रभावातून कथालेखन सुरू करणारे डॉ. विलास सारंग हे मात्र गाडगीळांपुढे खूप दूर निघून गेले. सारंगांनी मराठी कथा वैश्विक केली. याचे कारण ते या नियंत्रित मध्यमवर्गीय वर्तुळातून बाहेर पडलेच; शिवाय त्यांनी मराठी कथा अभूतपूर्व पातळीवर नेल्यामुळे त्यांच्या कथा फ्रेंच, जर्मन भाषेत गेल्या. यातील बऱ्याच कथा त्यांनी स्वत:च इंग्रजीत भाषांतरित केल्या. 'एक्झॉर्सिझम' (अप्रकाशित) ते 'प्रक्षिप्त जातककथा' (२००९) हा त्यांचा अनवट प्रवास, मध्यमवर्गीय जाणिवांपासून सुटका करून घेण्याचा प्रयत्न, धर्मशास्त्राला समांतर जाणाऱ्या आणि ब्राह्मणी साहित्याला प्रखर आक्रमक पद्धतीने विरोध करणाऱ्या त्यांच्या कथा अचंबित करणाऱ्या आहेत.

नवकथाकारांच्या नवतेच्या फालतू विचारव्यूहाला छेद देण्याचे काम दुसऱ्या टप्प्यातील कथाकारांनी समर्थपणे केले. जगभरातल्या घडामोडी साहित्याला जोडण्याचे अभूतपूर्व काम त्यांनी केले. मध्यमवर्गीय साचेबंदपणाला छेदून मोकळा श्वास पुरवणारी आशयसूत्रे अभिव्यक्तीच्या केंद्रस्थानी आणली गेली. ब्राह्मणी साहित्याची चिकित्सा, राजकीय-सामाजिक अभिसरणाला साहित्यव्यवहारात मोकळी वाट करून देणारे अवकाश, दलित-ग्रामीण कविता व आत्मकथनला मिळालेला अवकाश या गोष्टी जमेच्या मानता येतील. पण बव्हंशी मराठी कथा ही 'सत्यकथा'च्याच प्रभावाखाली राहिली. मात्र, पुढे मंडल आयोगाच्या शिफारशींमुळे जातीय समीकरणे बदलू लागली. ओबीसी हिंदुत्वासारखा आक्रमक झाला. स्वत:ला क्षत्रिय समजणारा मराठाही आक्रमक झाला. डॉ. आंबेडकरांनी जी मूल्ये दलित-बहुजनांच्या हाती दिली होती, ती याच काळात बाजूला फेकली गेली. काही मोजक्याच लोकांनी या प्रतिगामी शक्तींचा प्रतिरोध केला. संदिग्धता ही मराठी साहित्यात कायमच मध्यवर्ती राहिली असली तरी उत्तरआधुनिकेच्या सैद्धांतिक आवरणाखाली बऱ्याच जणांच्या संदिग्ध भूमिका वाढीस लागल्या. यामुळे

हिंदुत्ववादी मूल्यांनाच बळकटी प्राप्त झाली. काही अपवाद सांगता येतील- भाऊ पाध्ये (बेबी), वसंत आबाजी डहाके (जीभ), दि. पु. चित्रे (अब्राहमची वही), अनिल डांगे (मिस कोकाकोला, साधूवाण्याचे नाव, वारूळ, गारदी) रंगनाथ पठारे (सटाणा ते सटाणा, अनुभव विकणे आहे), श्याम मनोहर (बारके बारके राक्षस, अंधारात बसलेला काळा मठ्ठ बैल), भारत सासणे (एका प्रेमाची अजब दास्तान, राहीच्या स्वप्नाचा उलगडा); याशिवाय भास्कर चंदनशिव, चारुता सागर, सखा कलाल ही नावेही साहित्यमूल्यांचा विचार करता महत्त्वाची आहेत, असे लेखकाने म्हटले आहे.

विलास सारंग व बाबुराव बागूल हे या टप्प्यातील महत्त्वाचे कथाकार. नवता, परंपरा व साहित्यमूल्ये यांचा उत्तम आविष्कार त्यांच्या कथांमधून दिसतो. नवता ही थांबून राहणारी गोष्ट नसते हे सारंगांच्या कथांतून दिसते. परदेशी साहित्याच्या तुलनेत आपण काय करायला पाहिजे याचा उत्तम नमुना म्हणजे सारंगांच्या कथा होत. मनुस्मृतीला आव्हान देणाऱ्या 'अर्ध्यामुर्ध्या', 'रूपांतर', 'नारीसिंह', या सारंगांच्या विलक्षण कथा आहेत. मध्यमवर्गीय चौकट वजा करून लैंगिकता आणि विकृती यांना महत्त्व न देता पाश्चात्त्य आणि पौर्वात्य या दोन्ही परंपरांचा ते विचार करताना दिसतात. ब्राह्मणी साहित्याला पूरक ठरणारे वातावरण सारंगांनी प्रथमपासूनच जाणीपूर्वक नाकारले. त्यांच्या कथांमधून प्रयोगशीलतेबरोबरच तीक्ष्ण विचारव्यूह आणि चिकित्सा दिसते. याउलट, श्याम मनोहरांसारखा लेखक आपल्या परंपरेला गृहीत धरून प्रयोगशीलतेचे कर्मकांड उरकताना दिसतो, असा चिमटा ऐनापुरे काढतात. सारंगांची कथा ही कोणत्याही अर्थाने एकजिनसी नाही; त्यामुळेच तिची शैली निर्माण होण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. शैली निर्माण होऊ न देणारे सारंग हे मराठीतील एकमेव लेखक आहेत. प्रयोगापासून सुरू झालेले त्यांचे लेखन आशयापर्यंत येऊन थांबते. एका अर्थाने हे परंपरांतर आहे, असे निरीक्षण ऐनापुरे यांनी मांडले आहे.

बाबुराव बागूल यांच्या कथांची आशयसूत्रे केवळ वास्तवाच्या वर्णनात अडकून न पडता मनातल्या खळबळीसह पुढे येतात. त्यामुळे त्यांच्या कथेतला स्फोटकपणा हा आशयापासून वेगळा करता येत नाही. अर्थशास्त्र आणि धर्मशास्त्र शोषणाला कसं जवळ करतं याचा विचार त्यांच्या कथेत केंद्रस्थानी आहे. मूल्यांचा आग्रह आणि ठाम नकार ही त्यांच्या कथेची वैशिष्ट्ये म्हणता येतील. ब्राह्मणी समीक्षेने मात्र त्यांना दलित साहित्यात कोंबण्याची घाई केली. वास्तविक पाहता त्यांच्या पात्रांची जात ही श्रमिक व शोषित कष्टकऱ्यांची आहे. पण त्यांच्या कथांचे मूल्यमापन व्हावे तसे झाले नाही. राजा ढाले यांनी बागूल यांच्या कथांचे जे विश्लेषण केले आहे, त्यातील अंतर्विरोधाचा समाचार ऐनापुरे यांनी विस्ताराने घेतला आहे. ढाले यांच्या स्वकेंद्रित आणि सतत बदलणाऱ्या राजकीय भूमिकांमुळे दलित साहित्यात कंपूगिरी शिरली आणि प्रागतिक साहित्य चळवळीचे मोठे नुकसान झाले आहे असा निष्कर्ष त्यांनी काढला आहे.

कमल देसाई, ऊर्मिला पवार, प्रज्ञा दया पवार, सुकन्या आगाशे, मोहिनी वर्दे, मंगला गोडबोले, मेघना पेठे या कथालेखिकांचा उल्लेख या निबंधात येतो. यानिमित्ताने लेखिका, स्त्रीवाद, स्त्रीवादी साहित्य आणि एकूणच यासंदर्भातले चिकित्सक विवेचन विस्ताराने आले आहे. कमल देसाईंचे बंडखोर तत्त्व हे त्या ज्या काळात लिहीत होत्या त्या काळाशी बद्ध होते. आपल्या आशयसूत्रांना समाजवादाचा तळ नाममात्र देणाऱ्या त्या काळातल्या त्या एकमेव कथालेखिका असल्याने तत्कालीन समीक्षेला त्या बंडखोर वगैरे वाटल्या असणे शक्य आहे, असे मत ऐनापुरे यांनी नोंदवले आहे. 'हॅट घालणारी बाई' (१९७२) या दीर्घकथेतील नायिकेला बालकवींवर चित्रपट काढायचा आहे, हे काही बंडखोरीचे मूल्य होऊ शकत नाही.

प्रज्ञा दया पवार यांच्या कथांचे विश्लेषण करताना ऐनापुरे यांनी तथाकथित प्रागतिक, डाव्या व बंडखोरी वळणाने जाणाऱ्या स्त्री-कथाकारांचे विवेचन केले आहे. विशेषत: विसाव्या शतकाच्या सातव्या-आठव्या दशकांत स्त्रीवादी सिद्धांताचा पगडा मराठी साहित्यावर पडलेला दिसतो. तो प्रामुख्याने पाश्चात्त्य साहित्याकडून आपल्याकडे आला. फ्रेंच लेखिका सिमोन द बोव्हुआर लिखित 'द सेकंद सेक्स' (१९४९) या गाजलेल्या संहितेमधून हा स्त्रीवाद आपल्याकडे रुजला. यात गैर काही नाही. उलट, भारतीय स्त्री-साहित्याला त्यामुळे एक वेगळे परिणाम लाभले. हे पुस्तक म्हणजे स्त्रीवादावरील अत्यंत महत्त्वाची संहिता आहे यात वाद नाही. स्त्रीच्या दुय्यमत्वाची चर्चा विविधांगांनी यात आली आहे. पण भारतीय साहित्याचा स्त्रीवादी विचार करताना जातिव्यवस्था महत्त्वाची मानायची की लिंगभेद महत्त्वाचा मानायचा, हा तिढा सोडवायचा कसा, हा प्रश्न मात्र लेखिकांना पडलेला दिसत नाही. धर्मशास्त्राच्या वर्तुळात स्त्रीस्वातंत्र्याचा विचार अधिक संकुचित प्रकारे झाला आहे. धर्मशास्त्राच्या जंजाळातून आणि मनूच्या जाचातून सोडवून घेण्याचा प्रयत्न महाराष्ट्रात स्त्रीमुक्ती चळवळीतून झाला नाही. स्त्रीमुक्तीचा प्रश्न हा मानवमुक्तीच्या अंगाने जायला हवा होता. पण या चळवळीला ते भान नव्हते. बुद्धाच्या काळात लिहिला गेलेला 'थेरीगाथा' हा जगातला पहिला पाली भाषेतला स्त्रीविषयक ग्रंथ मानवमुक्तीचा संदेश देणारा आहे. डॉ. आंबेडकरांनी हिंदू कोड बिल मांडून स्त्रीसामर्थ्याला कायदेशीर आधार पुरवला. या महत्त्वाच्या दस्तावेजाकडे स्त्रीवादी चळवळ गेली नाही. याउलट, स्त्री-पुरुष समता व लिंगभेद या वर्तुळाभोवती ती फिरत राहिली. भारतातल्या जाती-जमाती, मध्यम व कनिष्ठ मध्यमवर्ग, त्याच्या क्रिया-प्रतिक्रिया तोलणारा धर्म किंवा या व्यवस्थेतून निर्माण केली गेलेली विषमता किंवा त्याचे शास्त्र याकडे या चळवळीचे लक्ष गेले नाही. इंदिरा गांधी, बेनझीर भुट्टो व चंद्रिका कुमारतुंगे या स्त्रिया सर्वोच्चपदी असतानाही लिंगभेदाच्या वर्चस्वाखालून स्वत:ला सोडवू शकल्या नाहीत. विवाहसंस्थेला नकार ही स्त्रीवादी स्त्रियांची स्त्री-स्वातंत्र्याच्या दृष्टीने एक अरभाट कल्पना आहे; ती भ्रामक आणि मानसिक आहे. ती एक तात्पुरती पायरी आहे. केस्लोव्हस्कीने आपल्या चित्रत्रयीमध्ये हे खूप चांगल्या प्रकारे दाखवले आहे. यावरून भारतीय स्त्रीवाद हा सुरक्षित व असुरक्षित स्त्रीमधील ध्यानात न येणारा सांस्कृतिक पेच आहे. याच उच्च शिक्षण घेतलेली स्त्री आपल्या स्वातंत्र्याला मुक्त होऊ देत असल्याने पुरुषाचं काय करायचं, हा तिच्यासमोरचा प्रश्न आहे. लिंगभेदाची जटिलता त्यातूनच निर्माण झाली आहे. लिंगभेदाकडे पूर्वग्रहाने पाहिल्याने विवाहसंस्था व कुटुंबसंस्थांना सामाजिक व्यवस्थेतून हद्दपार करण्याचा आग्रह निर्माण होतो. म्हणजे या शोषणाचे मूळ हे धर्मसंस्थेत आहे; त्यामुळेच स्त्रियांची सांस्कृतिक कोंडी होते का, याचा शोध घ्यायला आपण तयार नाही. मराठी साहित्यात बंडखोरी करणाऱ्या ब्राह्मण स्त्रिया विवाहसंस्था, कुटुंबसंस्था या स्त्रीवादाच्या महामार्गावर एखाद्या दुसऱ्या स्टेशनवर कशातरी पोहोचल्या. पण धर्मसंस्थेकडे वाकड्या नजरेने पाहण्याची त्यांना गरज वाटली नाही. धर्मसंस्था हा तर वर्चस्ववादाचा बालेकिल्ला आहे. मराठीतला पोकळ स्त्रीवाद ध्यानात घेतल्यावर स्त्रीस्वातंत्र्य हे मर्यादित होऊन पुन्हा धर्म व जातिसंस्थेच्या जाळ्यात अडकून पडते. डॉ. आंबेडकरांनी स्त्रीवादाचे हिंदुत्वाकडे जाणारे हे ब्राह्मणीकरण ओळखले होते. ते समजावून घेताना त्यांनी आपल्याकडील स्त्रीसत्ताक पुरुषसत्ताकतामध्ये कसे परावर्तित झाले आणि ते परत स्त्रीसत्ताकतेमध्ये कसे बदलायला हवे, हे हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून लिहून ठेवले आहे. पण याकडे कुणाचेच लक्ष गेलेले नाही, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. स्त्रीवादी साहित्याची यातील चिकित्सा शरद पाटील यांच्या संकल्पनांवर आधारित आहे. या दृष्टिकोनातून मराठी स्त्री-कथाकारांचा वेगळा विचार होण्याची आवश्यकता आहे. अनेक डाव्या गटांनाही यात त्रुटी जाणवतील यात शंका नाही. ऐनापुरेंनी या साठ पानी निबंधात मराठी कथेची मूलगामी चर्चा केली आहे. स्त्रीशोषण कसे संपवायचे किंवा जातिअंताच्या दिशेने मराठी साहित्याची मूल्ये कशी रुजवता येतील, या विषयाची गंभीर चर्चा झाली पाहिजे हा संदेश या पुस्तकाच्या निमित्ताने मिळाला तरी पुरेसे आहे. या पुस्तकात अनेक कथाकारांचे उल्लेख राहून गेलेत असे वाटते. उदा. गौरी देशपांडे, महादेव मोरे, उद्धव शेळके, रा. रं. बोराडे, आनंद यादव, वगैरे. तेव्हा ऐनापुरे यांनी मराठी कथेवर एक स्वतंत्र ग्रंथ लिहावा असे सुचवावेसे वाटते. त्यात मराठी कथेवरील सांगोपांग चर्चा होऊ शकेल.

**'मराठी कथा : मूल्य आणि ऱ्हास' - जी. के. ऐनापूरे, ललित पब्लिकेशन, मुंबई, पृष्ठे - ६२, मूल्य - ८० रुपये.**

(साभार - दै. लोकसत्ता - १८ डिसेंबर २०१६)